
सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर
शनिवार, ०२ फेब्रुवारी २०२५ वर्ष दुसरे अंक ३०८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रत्नागिरीच्या २ महाराष्ट्र नेवल युनिटचा देशभरात प्रथम क्रमांक

रत्नागिरी : २ महाराष्ट्र नेवल युनिट, रत्नागिरी यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत एनसीसी नेवल विंग अंतर्गत मेनू-२०२५ स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ५ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२४ दरम्यान मेनू-२५ शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात रत्नागिरी, वरवडे, जयगड, तवसाळ, वोरीया येथील पात्र कॅडेट्सनी सहभाग घेतला. संपूर्ण महाराष्ट्रातून निवड झालेल्या ६० एनसीसी कॅडेट्स या शिबिराचा भाग होते. या यशामागे कमांडर के. राजेश कुमार, समादेशक अधिकारी, २ महाराष्ट्र नेवल युनिट, रत्नागिरी यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. गेल्या चार वर्षांत सलग तीन वेळा प्रथम आणि एकदा द्वितीय क्रमांक मिळवण्याचा मान या युनिटने मिळवला आहे.

# अर्थमंत्र्यांच्या ७५ मिनिटांच्या भाषणातून मध्यमवर्गीयांसह अनेकांना दिलासा

दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज आठव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. हा एक अनोखा विक्रम आहे. याआधी सर्वाधिक अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम मोरारजी देसाई यांच्या नावावर आहे. मात्र त्यांनी वेगवेगळ्या कार्यकाळांमध्ये अर्थसंकल्प सादर केले आहेत.




२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएनं विजय मिळवला. त्यावेळी सीतारामन पहिल्यांदा अर्थमंत्री झाल्या. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी त्यांनी पूर्ण अर्थसंकल्प सादर केला. त्या वर्षीसाठी पियूष गोयल यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. तेव्हापासून आतापर्यंत सीतारामन सलग अर्थसंकल्प सादर करत आलेल्या आहेत. मोदी ३.० सरकारमधला हा त्यांचा पहिला पूर्ण अर्थसंकल्प आहे.

गेल्यावर्षी १ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पात सादर केलेला सर्वात कमी कालावधीचा अर्थसंकल्प फक्त ५७ मिनिटे चालला. त्यानंतर आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ७५ मिनिटे अर्थसंकल्पात सादर केला. या अर्थसंकल्पात झालेल्या घोषणांमुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे.




## भारतीयांची स्वप्न पूर्ण करणारा अर्थसंकल्प!

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून अर्थसंकल्पाचं कौतुक

नवी दिल्ली : आज सकाळी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या विकासासाठी काही महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त, लघू उद्योग, शेती, उत्पादन, रोजगारासह ३६ औषधांवरील करात सूट देण्याची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, या अर्थसंकल्पबाबत राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे.

'अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा प्रत्येक भारतीयाची स्वप्ने पूर्ण करणारा अर्थसंकल्प' असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासातील आजचा दिवस महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासातील आजचा अर्थसंकल्प गुंतवणूक आणि बचत वाढवणारा आहे. अर्थसंकल्पात सरकारची तिजोरी कशी भरली जाईल यावरच लक्ष केंद्रित केलं जातं. मात्र, हा अर्थसंकल्प त्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. देशातील नागरिकांचे खिसे कसे भरले जातील, देशातील नागरिकांची बचत कशी वाढेल आणि देशातील नागरिक विकासाचे भागीदार कसे होतील, याचे उदाहरण म्हणजे हा आजचा अर्थसंकल्प आहे.

त्याचबरोबर, या अर्थसंकल्पात अत्यंत महत्त्वाची आणि ठोस पावले उचलण्यात आली आहेत. हा अर्थसंकल्प देशाची शक्ती वाढवणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढेल. तसेच अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या घोषणा कृषी क्षेत्रात आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेत नव्या क्रांतीचा आधार ठरतील. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांना आणखी मदत मिळेल' असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

## १२ लाखांपर्यंत उत्पन्न करमुक्त; करदात्यांना मोठा दिलासा!

मुंबई : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी करदात्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. तिसऱ्या टर्मच्या पहिल्याच अर्थसंकल्पातून मोदी सरकारकडून मध्यमवर्गीय नागरिकांना हे मोठं गिफ्ट देण्यात आले आहे.

काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यमगींना दिलासा देण्यासंदर्भात संकेत दिले होते. १२ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना ८० हजारांपर्यंत फायदा होणार आहे. तर १२ लाख ते १६ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर १५ टक्के कर आकारला जाणार आहे.

यामुळे वेगळं भांडवली उत्पन्न नसणाऱ्या करदात्यांना १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असेल. नव्या पद्धतीनुसार कर भरणा करणाऱ्या करदात्याचं उत्पन्न १२ लाख रुपये असेल, तर त्याला ८० हजार रुपयांची करात सूट मिळेल. याचा अर्थ, त्याचा १०० टक्के कर माफ होईल. एखाद्या करदात्याचं उत्पन्न १८ लाख असेल, तर त्याला नव्या बदलांमुळे ७० हजारांचा फायदा होईल. याचा अर्थ त्याचा ३० टक्के कर कमी होईल. २५ लाख उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीचा १ लाख २५ हजारांचा कर कमी होईल, अर्थात त्याला २५ टक्के कर कमी भरावा लागेल.


## लक्ष्मीची पावले सर्वसामान्यांच्या घरी घेऊन येणारा अर्थसंकल्प

मुंबई : केंद्रीय अर्थसंकल्प हा लक्ष्मीची पावले सर्वसामान्यांच्या घरी घेऊन येणारा अर्थसंकल्प असल्याचे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. लक्ष्मी येती घरा तोचि दिवाळी दसरा अशी भावना आज प्रत्येक घराघरात निर्माण झाली असेल, कारण बारा लाखापर्यंतचे उत्पन्न आयकर मुक्त झाल्याने सर्वसामान्याना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्पातून छप्पर फाड के मिळाल्याची भावना घरोघरी व्यक्त होत असावी असे मत शिंदे यांनी व्यक्त केले. समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मत त्यांनी अर्थसंकल्पवार प्रतिक्रिया देताना व्यक्त केले.

केंद्रातल्या मोदी सरकारने आजपर्यंत देशात सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात कुणीही कधीही घेतला नाही असा न भूतो न भविष्यती असा निर्णय आयकाराच्या बाबतीत घेऊन देशातल्या करोडो मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिला आहे. बारा लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करणे आणि स्टँडर्ड डिडक्शनची मर्यादा ७५ हजार रुपयांपर्यंत वाढवणे या क्रांतिकारी घोषणेसह नव्या करप्रणालीत मोठे बदल केल्यामुळे देशभरातल्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय दुर्बल घटकांना फार मोठा दिलासा मिळाला आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. देशाचा आठवा अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातला विकसित भारत साकार करण्यासाठी रोडमॅप सादर केला आहे. आयकरातील मोठ्या सवलतीमुळे देशातल्या मध्यमवर्गीय, गरीब, दुर्बल यांना मोठे बळ देऊन देशाच्या विकासामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली आहे असेही उपमुख्यमंत्री म्हणाले. महिला आणि शेतकरी यांच्याकडे विशेष लक्ष देताना, कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानावर भर, रोजगार निर्मिती आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने ठोस पावलं या अर्थसंकल्पात टाकून सर्वसमावेशक विकासावर भर दिला आहे असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आजच्या अर्थसंकल्पीय भाषणात नव्या आयकर विधेयकाची घोषणा केली आहे. यामुळे कराच्या संपूर्ण रचनेत सुलभता आणून सर्वसामान्य करदात्यांना योग्य तो न्याय मिळेल अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. बारा लाख उत्पन्नपर्यंत कुठलाही कर न आकारण्याचा निर्णय हा मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा देणारा आहे असे उपमुख्यमंत्री म्हणाले. टीडीएसमधील घर भाड्याची मर्यादा वाढवणे, ज्येष्ठ नागरिकांना टीडीएस मर्यादा एक लाखांवर नेणं तसेच कर परतावा न भरलेल्यांसाठी चार वर्षांपर्यंत मर्यादा वाढविणे या गोष्टी करदात्यांना दिलासा देणाऱ्या आहेत असेही ते म्हणाले.

धनधान्य कृषी योजनेमुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या घरात समृद्धी येईल, किसान क्रेडिट कार्डसाठीची लिमिट वाढविणे, कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यात येणार असल्यामुळे दर्जेदार उत्पादनात लक्षणीय वाढ होईल.




## जीबीएसचे सावट! सर्वे क्षणासाठी १६ पथके तयार

पिंपरी : जीबीएस या आजाराचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात सर्वेक्षण करण्याकरिता ८ रुग्णालय झोन अंतर्गत प्रत्येकी दोन असे एकूण १६ पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत शनिवारअखेर १० हजार ७१८ घरे तपासण्यात आली असून यामध्ये गुइलेन बॅरे सिंड्रोम आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

जीबीएस या आजारामध्ये बाधित रुग्णांच्या मज्जातंतूवर आघात होऊन हा आजार संभावतो. या आजाराची लागण सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकते. अत्यल्प रूग्णांमध्ये गंभीर स्वरुपाची लक्षणे आढळून येतात. दुषित पाण्याद्वारे या आजाराची बाधा होण्याची शक्यता गृहीत धरून महापालिकेने त्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात आजअखेर गुइलेन बॅरे सिंड्रोम आजाराचे संशयित रुग्ण १५ आहेत.

यापैकी ६ रुग्ण बरे होऊन घरी सोडण्यात आलेले आहेत तसेच सर्व दाखल रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. या आजारावर उपचारासाठी आवश्यक असणारे औषधोपचार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर रुग्णालयांत उपलब्ध आहेत.



# आमदार अब्दुल सत्तार यांनी तालुक्यातील गावांना भेटी देत आभार दौरा केला पुर्ण

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ फेब्रुवारी

माजीमंत्री, आमदार अब्दुल सत्तार यांनी शुक्रवारी ( दि.३१) तालुक्यातील सावळदबारा,पिंपळवाडी,देव्हारी,टिटवी, पळासखेडा,डाभा,नांदातांडा,घाणेगाव तांडा,मोलखेडा, हिवरी,चारू तांडा,जामठी,रावळा,जावळा या गावांना भेटी देत आभार दौरा केला.यावेळी आ.अब्दुल सत्तार यांनी गावातील नागरिकांच्या शासनस्तरावरील समस्या, अडीअडचणी जाणून त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या.मतदारांनी ज्या विश्वासाने निवडुन दिले त्या विश्वासाला तडा जावू देणार नाही,मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.तालुक्यातील मतदारांची कायम साथ लाभली मतदारांनी सलग चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीत विजयी केले याबद्दल ऋण व्यक्त करीत आ. अब्दुल सत्तार यांनी मतदारांचे आभार मानले.

गावकऱ्यांनी मांडलेल्या सर्व समस्या आणि प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरु असून यासंदर्भात शासन स्तरावर योग्य तो पाठपुरावादेखील सुरु असल्याचे आमदार आ. अब्दुल सत्तार यांनी सांगितले.लवकरच वेगवेगळ्या गटांचा दौरा केला जाणार आहे.आणि याच दौऱ्यात मतदारांचे आभार आणि त्यासोबत लोकांच्या मागण्या,अडीअडचणी समजून घेत त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येणार असल्याचे आ.अब्दुल सत्तार म्हणाले.



या आभार दौऱ्यात शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर( आंबा) काळे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे,उपसभापती दारासिंग चव्हाण, संचालक नंदकिशोर सहारे,माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव,शिवप्पा चोपडे,माजी सभापती धरमसिंग चव्हाण, नगरपंचायतील शिवसना गटनेता अक्षय काळे,लखुसिंग राठोड,शिवसेना सोयगाव शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,नगरसेवक कदिर शहा,कुणाल राजपूत,मुकुंद तळेले,विशाल जाधव,मोहन सुरडकर,सांडू तडवी,सुरेश चव्हाण सरपंच घाणेगाव,कन्हीराम जाधव,शांताराम कांडेलकर,शामीरखा तडवी,वासुदेव कांडेलकर,लहू राठोड उपसरपंच टिटवी,प्रवीण सपकाळ,तुकाराम राठोड,संजय चिखले,उत्तम बोरसे,गंगाधर सदाशिवे माजी सरपंच पिंपळवाडी गोपाळ चव्हाण,करतार चव्हाण,गुलाब राठोड, पंडित राठोड माजी सरपंच,अनिल लोखंडे,राहुल हेल्लोडे सरपंच ढाबा ईश्वर शेळके,विठ्ठल दांडगे,हिरा जाधव, उपसरपंच घाणेगाव मदन राठोड,ज्ञानेश्वर वारंगणे सरपंच मोलखेडा स्वानंद पाटील,ज्ञानेश्वर पाटील,गुलाब राणा उपसरपंच मोलखेडा हिवरी आरिफ भैया उपसरपंच डॉक्टर जाफर सय्यद,अनिल पाटील,शेख फिरोज,रहीम भाई आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री स्वामी विवेकानंद शाळेत आनंद नगरी व हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात साजरा



सिल्लोड प्रतिनिधी

मंगरूळ येथील श्री स्वामी विवेकानंद शाळा व जुनियर कॉलेज शिवगड मोढ़ा बु मधील आनंद नगरी व हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी अगदी शिस्तबद्ध कार्यक्रम घेऊन आपल्या शाळेची चुणूक दाखवून

दिली आनंद नगरी कार्यक्रम मध्ये लहानशा चिमुकल्याने दुकानाचे स्टॉल टाकून सर्वांचे लक्ष वेधले होते मंगरूळ गावातील व मोठा बुद्रुक येथील शेकडो नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते

शाळेने महिलाची विविध खेळ घेऊन कार्यक्रम रंगदार झाला होता तसेच लहान व मोठ्या मुलांचे कराटे कार्यक्रम घेऊन पालकांची मने जिकण्यात शालेय नियोजन समिती यशस्वी ठरली कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका सोनाली नागरे व प्राध्यापक किशोर नागरे यांनी केले.

## ग्राहकाभिमुख सेवा देण्यात युनियन बँक अग्रेसर : पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील

### प्रवरानगर शाखेचे नवीन कार्यालयात स्थलांतर



नगर : राष्ट्रीयकृत बँकांमध्ये अग्रगण्य असलेली युनियन बँक ऑफ इंडिया नगर जिल्ह्यात ग्राहकाभिमुख सेवा देण्यात अग्रेसर असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

बँकेच्या प्रवरानगर शाखेचे नवीन सुसज्ज जागेत स्थलांतर व लोकार्पण सोहळा ना. विखे पाटील यांचे शुभहस्ते नुकताच संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, युनियन बँकेचे अंचल प्रमुख नवीन जैन, क्षेत्र प्रमुख सुनील कुमार यादव, उपक्षेत्र प्रमुख सुभाष गजभिये, शाखाधिकारी अमोल जाधव तसेच बँक अधिकारी, कर्मचारी व मान्यवर ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अंचल प्रमुख नवीन जैन यांनी बँकेच्या विविध कर्ज योजना, बचत ठेव योजना तसेच अधिकाधिक ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी बँकेचे विविध उपक्रम याबाबत उपस्थितांना माहिती दिली.

नव्या प्रशस्त शाखेच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक, व्यापारी, महिला, विद्यार्थी, नोकरदार तसेच समाजातील अन्य घटकांना तत्पर अर्थ सेवा उपलब्ध होणार असल्याचे यावेळी श्री यादव यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते काही मंजूर कर्जांचे वितरण करण्यात आले.

## दुचाकी वाहनांच्या सायलेन्सर मध्ये अनधिकृत बदल करू नयेत

### शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांचे आवाहन

नगर : शहरात दुचाकी वाहनांच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृतपणे बदल करून फटाकड्यांसारखा विचित्र आवाज निर्माण करण्याचे अनुचित प्रकार दिसून येत आहेत. अशाप्रकारे सायलेन्सरमध्ये बेकायदेशीरपणे बदल करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या व सामाजिक शांतता भंग करणाऱ्या दुचाकी वाहन चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तशा सूचना तोफखाना, कोतवाली पोलिस स्टेशन व शहर वाहतूक नियंत्रण शाखेला देण्यात आलेल्या आहेत. कर्कश आवाज निर्माण करून छाप पाडण्यासाठी दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृत फेरबदल करू नयेत व संभाव्य कारवाई टाळण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले आहे.


**जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव**

पोस्ट बॉक्स नं.32, शिवाजी नगर रोड, जळगांव -425001.
फोन नं. 0257-2226645-48; फॅक्स नं. 0257-2225611

**टेंडर नोटीस**

जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी
खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | तपशील | अ. क्र | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | लस्सी कप खरेदी | 5 | स्क्रॅप बटर कारटन विक्रीचा वार्षीक करार |
| 2 | लायनर खरेदी | | |
| 3 | पेपर रोल खरेदी | 6 | साखर खरेदी |
| 4 | मल्टीपर्पज खोवा मशीन खरेदी | 7 | रबर मॅट खरेदीचा वार्षीक करार |

सदर निविदेतील मालाचा तपशील, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर पाहावयास मिळतील. अ.क्रं. 01 ते 07 च्या निविदा दि. 07/02/2025रोजी संध्या 5.00 वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे. सदरच्या जाहीराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल.

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार संघाने राखुन ठेवलेला आहे.

कार्यकारी संचालक


## टिकवण क्षमता असलेल्या विकसित टरबूज, खरबुजांची लागवड करावी 'शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद' मध्ये डॉ. संजूला भावर यांचा सल्ला

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : टरबूज व खरबूज लागवडीसाठी दर्जेदार रोपे घेणे किंवा स्वत: रोप निर्मिती करून त्यांची लागवड करणे आवश्यक आहे. दोन वाफ्यातील अंतर पाच ते सहा फूट, तर दोन रोपांतील अंतर एक ते दोन फूट ठेवावे. टरबूजच्या अरका माणिक, दुर्गापूर केशर, पुसा बेदाणा, शुगर बेबी, अर्का मधू इत्यादी जाती एकदम चांगल्या आहेत. त्याची टिकवण क्षमता जास्त आहे. खरबूज साठी कुंदन, बॉबी, अर्का गजन, हरा मधू इत्यादी जातींची निवड करावी, असा सल्ला केव्हीकेचे विषय विशेषज्ञ डॉ. संजूला भावर यांनी शनिवारी, १ फेब्रुवारी २०२५ रोजी येथे दिला.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने १०७ वा शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमात भावर बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दिलीप हिंगोले, विषय विशेषज्ञ डॉ. बस्वराज पिसुरे, डॉ. अनिता जिंतूरकर, प्रगतशील शेतकरी गंगाराम तायडे यांची उपस्थिती होती.

'टरबूज व खरबूज पीक व्यवस्थापन' बाबत मार्गदर्शन करताना डॉ.भावर म्हणाले, भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी एकात्मिक पद्धतीचा अवलंब करावा. तसेच या दोन्ही पिकांमध्ये क्रॉप कव्हर (पीक आच्छादन) चा वापर करणे फार उपयुक्त आहे. यामुळे पहिल्या तीस दिवसांपर्यंत किडींचा व रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास फायदा होतो. यामुळे फवारणीवरील खर्च देखील कमी होतो. तसेच पोषक वातावरण निर्मितीमुळे अधिक व लवकर उत्पादन घेणे शक्य होते. तसेच क्रॉप कव्हरचा वापर काळजीपूर्वक केला त्याचा वापर तर दोन-तीन वर्षापर्यंत करता येतो. अन्नद्रव्य व्यवस्थापन करताना दीड बॅग डीएपी आणि एक बॅग एमओपी ची मात्रा लागवड करताना द्यावी. कॅल्शिअम नायट्रेट, बोरॉन यांची देखील फवारणी घेणे या दोन्ही पिकात फार महत्वाचे आहे.

'रोग व्यवस्थापन' विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.दिलीप हिंगोले म्हणाले, रोग नियंत्रणासाठी यजमान पीक, वातावरण इत्यादी घटकांचा विचार करणे फार महत्वाचे आहेत. मोसंबी मध्ये डिंक्या हा रोपवाटिकेतील नियोजनाच्या अभावामुळे देखील होऊ शकतो. तसेच रोपावस्टेट मर, मूळकूज देखील होतो त्यावेळी मेटालेक्झील, कॅप्टन इत्यादि बुरशीनाशकाची तज्ज्ञांच्या सल्ल्याने फवारणी करावी. जलद ऱ्हास (ट्रीस्टीजा व्हायरस) यांचा देखील प्रादुर्भाव दिसून येतो. खैऱ्या रोगाच्या नियंत्रणासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन व कॉपर ऑक्सिक्लोराईड यांचा वापर करावा.

अध्यक्षी समारोपात डॉ. पाटगांवकर म्हणाल्या, केव्हीकेद्वारे शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येतो. यास शेतकरी बांधवानी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा. शेतीतील विविध तंत्रज्ञानाच्या माहितीसाठी केव्हीकेशी संपर्क साधावा. डॉ. बस्वराज पिसुरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन जयदेव सिंगल, जयदीप बनसोडे यांनी केले.

## जैनम महिला मंडळाच्या हळदी कुंकु; कार्यकमात ६00 महिलांची उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – जैनम महिला मंचच्या वतीने विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी येथे हळदी कुकुंचा कार्यकम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यकमामध्ये महिला मंचने योगगुरू न्युमरालॉजीस्ट सचिन कुमार यांचे व्याख्यान आयोजीत केले होते. त्यांनी आपल्या भाषणात १ ते ९ अंकाचे विशेष गुण, सवयी स्वत:हा विषयी व व्यक्तीत्वाची उत्कृष्ट पध्दतीने जान करून दिली. त्याच्या या वक्तव्याचा महिलांनी खुप आनंद घेतला. . सुर्यग्रह तारे यांच्यावर अवलंबुन न राहता सायंटीफिक मेमरी टिचींगने आयुष्य समजावुन घ्या व पुढे चला. असे त्यांनी सांगीतले. अंक शास्त्रानुसार दोन जुळया मुलांचे भविष्य एक सारखे नसतात. कारण त्यांचे





नाव, जन्माची वेळ, पुढे चालुन मोबाईल नंबर सुध्दा वेगळा होत असतो. नामांक, मुल्यांक वेगवेगळे असतात. अशी माहिती दिली. मुल्यांक १ मध्ये महत्वकांक्षा व प्रतिष्ठा व वैभवशाली जीवन, मुल्यांक २ मध्ये कार्याच्या प्रति शितलता, मुल्यांक ३ मध्ये नेतृत्व व क्षमता व विवेकशिलता, मुल्यांक ४ मध्ये सहिष्णुता व लगन, मुल्यांक ५ मध्ये विश्वसनियता व व्यवहार कुशलता, मुल्यांक ६ मध्ये कलाप्रेमी व सौदर्य उपासक, मुल्यांक ७ मध्ये दर्शनिकता व कल्पनेचा संगम, मुल्यांक ८ मध्ये परिश्रम व निरंतरता, मुल्यांक ९ मध्ये आवेश व शौर्या बददल सांगीतले.

यावेळी शकुंतला देसरडाआहारतज्ञ यांनी आहार विषयी माहिती दिली. महिलांनी आपल्या आहाराकडे विशेष लक्ष दयायचे सांगीतले. कार्यकमासाठी संगीता संचेती व ललीता साकला यांनी प्रायोजक स्विकारले. कार्यकमात ६०० महिलांची उपस्थिती होती. कार्यकम यशस्वी करण्यासाठी भारती बागरेचा, कविता अजमेरा, मंगल पारख, आशा कासलीवाल संगीता कासलीवाल अर्चना दुग्गड यांनी परिश्रम घेतले. कार्यकमाचे सुत्रसंचालन भक्ती संकलेचा यांनी केले. यावेळी मिना पापडीवाल, मंजु पाटणी, सारिका साहुजी, कमलाबाई ओस्तवाल, पुष्पा बाफना, मनिषा भंसाली, शोभा अजमेरा, अनिता पहाडे, सरोज काला, पल्लवी शहा, मेघा सुगंधी मंगल बागरेचा चंचल बाई चोपडा निर्मला मुथा आदीची उपस्थिती होती. यावेळी जैनम् महिला मंचच्या वतीने विविध गेम घेण्यात आले व आनंदपुर्ण उत्साहात हळदी कुंकुचा कार्यकम उत्साहात संपन्न झाला.

## औद्योगिक वसाहत क्षेत्राच्या हद्दीतील अतिक्रमणे तातडीने काढा-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर दि.१- जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगस्नेही वातावरणासाठी सुपा व अहिल्यानगर औद्योगिक वसाहत क्षेत्राच्या हद्दीतील अतिक्रमणे तातडीने काढण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सुपा व पारनेर औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश



ओला, पारनेरचे उपविभागीय अधिकारी श्रीकांत चिंचकर, तहसिलदार श्रीमती गायत्री सौंदणे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये अधिकाधिक उद्योग येऊन जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याला शासनामार्फत प्राधान्य देण्यात येत आहे. सुपा व अहिल्यानगर औद्योगिक वसाहतीच्या हद्दीमधील अतिक्रमणे आणि नियमबाह्य टपऱ्याबाबत ठोस कारवाई करत येत्या १५ दिवसांमध्ये करावी औद्योगिक वसाहतीच्या हद्दीतील परिसर अतिक्रमणमुक्त करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

कामगार विभाग, प्रदुषण महामंडळ तसेच औद्योगिक विकास विभागांच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या तपासणी करत प्रदुषणांच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती जमा करावी. कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तसेच औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांच्या प्रमुखांसमवेत बैठकीचे आयोजन करण्याच्या सुचनाही श्री.विखे पाटील यांनी यावेळी केल्या.

बैठकीस संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्राप्त झालेल्या रुग्णवाहिकांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते वाटप

अहिल्यानगर दि.१-राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्राप्त झालेल्या १९ रुग्णवाहिकांचे वाटप करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार मोनिका राजळे, अमोल खताळ, विठ्ठल लंघे, काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब



नागरगोजे आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागाअंतर्गत एकुण ११५ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असून त्यापैकी १०२ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. सहसंचालक आरोग्य सेवा मुंबई कार्यालयाकडून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कालबाह्य झालेल्या रुग्णवाहिकाच्या जागेवर १४ व ५ नवीन सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी अशा एकूण १९ रुग्णवाहिका प्राप्त झाल्या आहेत.

१ रुग्णवाहिकाची किंमत रु.१७ लक्ष ९५ हजार असून १९ रुग्णवाहिकांसाठी एकुण ३ कोटी ४१ लक्ष ५ हजार रुपये खर्च करण्यात आला आहे.

रुईछत्तीशी ता. नगर, लाडगांव ता. अकोले, खर्डा ता. जामखेड, शिऊर ता. जामखेड, सोनेगांव ता. जामखेड, संवत्सर ता. कोपरगांव, वारी ता. कोपरगांव, वाकडी ता. राहता, अस्तगांव ता. राहता, डोऱ्हाळे ता. राहता, सावळीविहीर ता. राहता, तिसगांव ता. पाथर्डी, भातकुडगांव ता. शेवगांव, दहिगांव ता. शेवगांव, आढळगांव ता. श्रीगोंदा, काष्टी ता. श्रीगोंदा, म्हैसगांव ता. राहुरी जोर्वे ता. संगमनेर आणि कोंभळी ता. कर्जत या प्राथमिक आरोग्य केंद्रांना या रुग्णवाहिका देण्यात आल्या.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८६/२०२५

अर्जदार : १) सुभाष पिता धोंडीराज मुळे, रा.आसेगाव, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर २) सुमनबाई भास्कर जोशी, रा.बाजार गल्ली, खुल्ताबाद, ता.खुल्ताबाद, जि.छ. संभाजीनगर ३) सरोजीनीबाई यशवंतराव मुळे, रा.तळेसमन, ता.गंगापुर जि.छ. संभाजीनगर ४) पुष्पा सोनोपंत जोशी, रा.घोडेगाव, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.पी.आर. बरडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. २ ते ४ हया आपसात सख्या बहिणी असुन अर्जदार नं. १ हा त्यांचा सख्खा भाऊ आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांचे पिता नामे धोंडीराम उर्फ धोंडीराज गंगाधर मुळे हे मौजे सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते. ते दि.०२/०१/१९७४ रोजी मौजे सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ४ यांची आई नामे व्दारकाबाई धोंडीराज मुळे हया दि.२५/०४/२००२ रोजी मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ४ यांचा भाऊ नामे उध्दव धोंडीराज मुळे हा अविवाहित होता व तो अविवाहितच दि.०३/०९/१९९८ रोजी मयत झालेला आहे. मयतांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०१/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.४२/२०२५.

१. सिध्दार्थ संपत पगारे, वय ७२ वर्षे, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. संदिप सिध्दार्थ पगारे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ३. विनोद सिध्दार्थ पगारे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ४. दिपक सिध्दार्थ पगारे. वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सिताबाई सिध्दार्थ पगारे यांचा दिनांक १५/११/२०२४ रोजी आमखेडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत सिताबाई सिध्दार्थ पगार यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामामाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीर्ररत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०१/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.१२/०३/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४४/२०२५.

१. यशोदाबाई जगन्नाथ बाविस्कर, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. संजय जगन्नाथ बाविस्कर, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत जगन्नाथ धनजी सुतार (बाविस्कर) यांचा दिनांक २१/११/२०११ रोजी सोयगाव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत जगन्नाथ धनजी सुतार (बाविस्कर) यांचे वारस असुन त्यांना शाकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनो ह जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०१/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.१३/०३/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३५/२०२८

१/– पुष्पाबाई संजय परदेशी उर्फ छानवाळ, वय–५९ वर्ष, धंदा–शेती, रा. पळासखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/– प्रविण संजय परदेशी उर्फ छानवाळ, वय २० वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे, ३– सुशीला संजय परदेशी उर्फ छानवाळ, वय १७ वर्षे, अ.पा.क म्हणून अर्जदार क्र. १

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारमप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत संजय विठ्ठल परदेशी उर्फ छानवाळ यांचा दि. ०२/०६/२०२२ रोजी मौजे पळासखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत संजय विठ्ठल परदेशी उर्फ छानवाळ यांचे वारस असुन त्यांना मयत संजय विठ्ठल परदेशी उर्फ छानवाळ यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. १/२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. १०/३/२०२५.

आदेशावरुन

क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## केंद्रीय अर्थसंकल्प प्रतिक्रिया

### शेतकरीहिताचा निर्णय नाही

केंद्रीय २०२५-२६ बजेट समाधानकारक नाही. यात सर्वसामान्य नागरिकांना कोणताही फायदा नाहीच, पण शेतकऱ्यांची औजारे, औषधी आणि बी-बियाणांवरील जीएसटी, हमीभाव, निर्यात शुल्क आणि आयात बंदी आदींबाबत कोणताही निर्णय नाही. गरीबांसाठी मध्यम बजेटमध्ये सध्या तरी काही आहे, असे दिसत नाही. भविष्यात रुपयाच्या किंमतीवर नियंत्रण आले तरच देशाचे भले होईल, अन्यथा गरीब आणि श्रीमंत अंतर अधिक वाढेल आणि मोठी आर्थिक अराजकता माजेल, यात शंका नाही.

– महेशभाई गुजर, शेतकरी कृती समिती

### कर्ज माफीबद्दल एक शब्दही नाही

केंद्रीय अर्थसंकल्पात शेती आणि शेतकऱ्यांना झुकते माप दिले गेल्याचे भासवण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र शेतीसाठी करण्यात आलेल्या बहुतांशी घोषणा या सुद्धा उद्योगपती आणि कॉर्पोरेट कंपन्यांनाच लाभ पोहोचवणाऱ्या आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून त्यांच्या कापसाला रास्त भाव मिळेल, यासाठी ठोस तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली असती तर ती खऱ्या अर्थानं कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देणारी ठरली असती. प्रत्यक्षात मात्र टेक्स्टाईल इंडस्ट्रीसाठी तरतूद करण्यात आली आहे व त्यामुळे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांचं भलं होणार असल्याचे भासवलं जात आहे. सरकारच्या धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. किसान सभा व शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, ही मागणी सातत्याने लावून धरलेली आहे. केंद्र सरकार मात्र जाहीर न करता कॉर्पोरेट कंपन्यांची कोट्यवधींची कर्जे माफ करत आहे. शेतकरी कर्जमाफीबद्दल मात्र एक शब्द सुद्धा उच्चारण्याची तसदी सरकारच्या वतीने घेतली जात नाही. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शेतकरी कर्जमाफी बद्दल काही पावले टाकली जातील अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र तसे झालेले नाही.

-डॉ. अजित नवले, केंद्रीय सहसचिव, अ. भा. किसान सभा.

### ट्रस्टसाठी दिलासादायक निर्णय

धार्मिक आणि लोकोपयोगी ट्रस्टसाठी कलम १२ एबी अंतर्गत नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे, त्यामुळे अनुपालनाचा बोजा कमी होईल. यापूर्वी, अर्जामधील किरकोळ त्रुटींमुळे अर्ज रद्द केला जात असे आणि संचित उत्पन्नावर कर लावला जात होता. मात्र, आता अपूर्ण अर्जास निर्दिष्ट उल्लंघन मानले जाणार नाही, त्यामुळे ट्रस्टसाठी दिलासादायक निर्णय अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. तसेच, मागील दोन आर्थिक वर्षांमध्ये ५ कोटींपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लहान ट्रस्टसाठी नोंदणीचा वैधता कालावधी ५ वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला आहे, ज्यामुळे अनुपालन खर्च कमी होईल आणि सामाजिक कार्यावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

– सपना लुणावत, सीए

### कापूस उत्पादकांना प्रोत्साहन

देशातील कापूस उत्पादनाची क्षमता वाढविण्यासाठी केंद्र सरकारने दिलेले प्रोत्साहन एक सकारात्मक पाऊल ठरले आहे. कृषी क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने सरकारने घेतलेली धोरणे स्पष्टपणे दिसून येत आहेत. यामध्ये १०० जिल्ह्यांसाठी 'धनधान्य कृषी योजना', १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ, डाळींच्या उत्पादनात स्वावलंबी होण्यासाठी सरकारचा सहा वर्षांचा कार्यक्रम तसेच तूर, उडीद आणि मसूर या पिकांवर विशेष लक्ष देणे समाविष्ट आहे. भाजीपाला आणि फळांचे उत्पादन वाढवण्यासाठी, तसेच किफायतशीर दर देण्यासाठी एक व्यापक कार्यक्रम राबवला जाणार आहे. याव्यतिरिक्त केंद्र सरकारने 'किसान क्रेडिट कार्ड' ची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाख करण्याचा निर्णय घेतला आहे.

समीर पद्माकर मुळे, अध्यक्ष, 'सियाम'

## विकासाभिमुख केंद्रीय अर्थसंकल्प : डॉ धनंजय दातार



डॉ धनंजय दातार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, संयुक्त अरब अमिरात (यूएई)

आज जाहीर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प खरोखर विकासाभिमुख आहे. केंद्र सरकारने कृषी, लघु व मध्यम उद्योग, गुंतवणूक व निर्यात हे प्रगतीचे चालक घटक (इंजिन्स) मानले असून त्यात भरीव व दूरगामी परिणाम घडवणारी पावले टाकली आहेत. नव्या पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेचा फायदा कमी कृषी उत्पादकता असलेल्या १०० जिल्ह्यांतील १.७० कोटी शेतकऱ्यांना होईल व कृषी उत्पादन वाढेल. डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच फळे व भाज्या आणि कापूस उत्पादन वाढवण्यासाठी आखलेली दीर्घकालीन योजना स्वागतार्ह आहे. लघु व मध्यम उद्योजकांना विनातारण हमी कर्ज साह्य पाच कोटी रुपयांवरुन वाढवून दहा कोटी रुपये करणे आणि महिला तसेच अनुसूचित जाती व जमाती गटांमधील प्रथमच उद्योजक बनणाऱ्यांना पुढील पाच वर्षांत दोन कोटी रुपयांपर्यंतचे मुदत कर्ज देणे या योजनांमुळे उद्योजकतेत नक्कीच वाढ होईल. तरुणांमध्ये जागतिक दर्जाच्या कौशल्य विकासासाठी पाच नॅशनल सेंटर्स ऑफ एक्सलन्स स्थापन करणे, खासगी क्षेत्राला संशोधन, विकास व अभिनवता पुढाकार राबवण्यासाठी २० हजार कोटींच्या निधीची तरतूद करणे आणि निर्यात वाढीला उत्तेजन देण्यासाठी देशी उद्योगांना साह्य व प्रोत्साहन देणे, ही सरकारची पावले नक्कीच कौतुकास्पद आहेत.

## लोहगाव येथे पंचवीस वर्ष विवाहित महिलेची गळफास घेऊन आत्महत्या : घातपात असल्याचा नातेवाईकांचा संशय

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील लोहगाव येथे एका पंचवीस वर्षीय विवाहित महिल्याने गळफास घेऊन आत्महत्या, घातपात असल्याचा नातेवाईकांचा संशय, सविस्तर माहिती अशी की लोहगाव येथील लक्ष्मी संतोष पाबळे वय २५ वर्ष रा लोहगाव ता पैठण या विवाहित महिल्याने शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी रात्री आठ वाजेच्या दरम्यान राहत्या घरामध्ये साडीच्या साह्याने गळफास घेतल्याचे आढळून आले ही घटना नातेवाईकांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी लक्ष्मीबाई संतोष पाबळे त्यांना ग्रामीण रुग्णालय बिडकीन उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी तपासून मृत्यू घोषित केले व आज दि १ फेब्रुवारी रोजी डॉ वैद्यकीय अधिकारी बाळासाहेब घुगे, डॉ शाहा यास्मीन, यांनी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले, लक्ष्मी संतोष पाबळे यांची अंत्यविधी लोहगाव येथे पोलीस बंदोबस्तात करण्यात आली आहे, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे,संजय चव्हाण करीत आहे.

## टाटा सॉल्ट ठरले सर्वोत्तम शुद्ध

नांदेड : भारताच्या आयोडीनयुक्त मीठ क्षेत्रातील आणि बाजारपेठेतील अग्रणी टाटा सॉल्टने १९८३ पासून आपल्या उत्पादनांमध्ये अतुलनीय शुद्धता आणि परिष्करणाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रयोगशाळेतील चाचणीद्वारे सिद्ध झाले आहे की टाटा सॉल्ट हे देशभरातील १०० मीठांपैकी सर्वाधिक शुद्ध आहे. या उपक्रमामुळे टाटा सॉल्ट केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात शुद्धतेचा आणि प्रामाणिक अस्सलतेचा मापदंड ठरले आहे. टाटा सॉल्ट हे उत्कृष्टतेच्या बांधिलकीने प्रेरित, मीठ उद्योगातील सर्वोच्चतेचे प्रतीक आहे. या उपक्रमाद्वारे देशभरातील विविध प्रकारच्या मीठांशी कठोरपणे तुलना करून टाटा सॉल्टने आत्मविश्वासपूर्वक आपल्या सर्वोत्तमपणाचा दावा केला आहे. दर्जाच्या प्रति अपार निष्ठा आणि नवीन मानक स्थापित करण्याच्या दृढ निर्धारामुळे, टाटा सॉल्ट हा अतुलनीय शुद्धतेत आणि उत्कृष्ट दर्जाच्या शोधात असलेल्या ग्राहकांसाठी अंतिम पर्याय ठरतो.

# आयपीएस अधिकाऱ्यांच्या पतीकडून २५ कोटीचा गंडा; मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.१ फेब्रुवारी : महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या एका महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या ठकसेन पतीचा फसवणुकीचा आणखी एक प्रताप चव्हाट्यावर आला आहे.शासनाच्या कोट्यातून घर मिळवून देण्याच्या आमिषाने पुरुषोत्तम प्रभाकर चव्हाण याने २० जणांना २५ कोटींना गंडा घातला आहे. मुंबई आर्थिक गुन्हा अन्वेषण शाखेने त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. चव्हाण हा सध्या सक्त वसुली संचालनालयाच्या ईडी कोठडीत असून तो होमगार्ड व नागरी संरक्षण विभागातील मधील अधीक्षक रश्मी करंदीकर यांचा पती आहे. याबाबत त्याचा लवकरच जबाब नोंदविण्यात येणार असल्याचे तपास अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

२६३ कोटीच्या आयकर परताव्यामध्ये फसवणूक केल्याप्रकरणी वर्षभरापूर्वी ईडीने त्याच्यावर कारवाई केली आहे. त्याबाबतच्या चौकशीतून पुरुषोत्तम चव्हाणने दादर , प्रभादेवी,ठाणे व पुण्यात घर मिळवून देण्याच्या आमिषाने त्याने अनेकांची फसवणूक केल्याची बाब समोर आली होती. त्यांनी याबाबत मुंबई पोलिसांना कळविले होते.त्यानंतर' इव्होडब्लू' याबाबत तपास करून सायन येथील ५७ वर्षीय व्यावसायिक केदार देगवेकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.त्यांच्यासह अन्य १९ जणांना गंडवले आहे.विशेष म्हणजे करंदीकर ज्या शासकीय निवासस्थानी राहतात त्या कुलाबा पोलीस ठाण्यातील वरच्या मजल्यावर असलेल्या फ्लॅटमध्ये बोलवून त्याने ही फसवणुक केली आहे.

### करंदीकर यांचाही घेणार जबाब

आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग लवकरच आयपीएस रश्मी करंदीकर यांच्याकडे याप्रकरणी चौकशी करून त्यांचा जबाब नोंदवणार आहे.तसेच गुन्हा घडलेल्या शासकीय निवासस्थानाची झडती घेण्यात येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

ईडीला पहिल्यांदा अनियमितता आढळून आली. २६३ कोटी रुपयांच्या आयकर परतावा (आयटीआर) फसवणूक प्रकरणात चव्हाण यांच्या भूमिकेची चौकशी करत असताना ही अनियमितता उघडकीस आली. याप्रकरणी चव्हाण याच्यासह यामध्ये प्रसाद देसाई, संजय पाटील, गणेश पाटील, दीपक मोरे, एन. डी. निर्मळे, गोविंद सावंत, शशांक लिमये, यशवंत पवार, सहाय्यक उपनिबंधक आणि परळ-सेवरी मुद्रांक नोंदणी कार्यालयातील अधिकारी आणि मुख्य गुन्हेगाराला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे डुप्लिकेट कागदपत्रे तयार करण्यास मदत करणारे इतर लोक समाविष्ट आहेत. या सर्वांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४१९ (तोतयागिरी करून फसवणूक), ४६५ (बनावट), ४६७ (मौल्यवान सुरक्षेची बनावटगिरी), ४६८ (फसवणूक करण्याच्या उद्देशाने बनावटगिरी), ४७१ (खरे म्हणून बनावट कागदपत्रे किंवा इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड वापरणे), १२० ब (गुन्हेगारी कट) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एफआयआरनुसार, चव्हाण यांनी मंत्रालय आणि इतर सरकारी विभागांमधील आपल्या प्रभावाचा वापर करून सरकारी कोट्यातील मालमत्ता (जमीन आणि फ्लॅट) सवलतीच्या दरात विकण्याच्या बहाण्याने इतर आरोपींच्या खात्यातून त्यांच्या खात्यात पैसे स्वीकारून तक्रारदार आणि इतर लोकांची फसवणूक केली.

### चव्हाण ८ महिन्यापासून ईडीच्या ताब्यात

२६३ कोटींच्या आयकर परताव्याचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी ईडीने गेल्यावर्षी गुन्हा दाखल केला. माजी आयकर अधिकार्यांना पकडल्यानंतर चव्हाणला २० मे रोजी अटक करण्यात आली.सध्या तो तुरुंगात आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यात त्याला लवकरच ताब्यात घेण्यात येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

त्याने ठाणे ५ येथील उपनिबंधक कार्यालयात आणि परळ-सेवरी येथील मुद्रांक नोंदणी कार्यालयात त्यांच्या मालमत्ता नोंदणीकृत असल्याचे भासवले. आरोपींनी बनावट कागदपत्रांचे फोटो काढले आणि ते खरे असल्याचे भासवून पीडितांना पाठवले आणि त्यांच्या छायाप्रतीही दिल्या, आधी पैसे द्यावे लागतील आणि नंतर ते सरकारकडे जमा करतील आणि त्यानंतर सरकारी कोट्यातून घर वाटपाची प्रक्रिया पूर्ण होईल आणि आम्हाला ताबा मिळेल, ज्याला मी सहमती दर्शविली, असे तक्रारदार केदार देगवेकर यांनी एफआयआरमध्ये म्हटले आहे.

माझ्याप्रमाणेच आरोपींनी इतर १९ पीडितांकडून पैसे घेतले आणि त्यांना बनावट विक्री कराराची कागदपत्रे दिली ज्यात सरकारी कोट्यातील फ्लॅट्समधील अधिकृत विक्रेत्यांची नावे प्रसाद देसाई, संजय पाटील, गणेश पाटील, दीपक मोरे, एन डी निर्मले, गोविंद सावंत, शशांक लिमये आणि यशवंत पवार अशी होती, असे देगवेकर यांनी त्यांच्या जबाबात म्हटले आहे.

# बिडकीन पोलीसांनी बोकुड जळगाव येथील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीस चोवीस तासात केले अटक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोकुड जळगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील चोरीचा गुन्हा आरोपी अवघ्या चोवीस तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात बिडकीन पोलीसांना प्रथम यश आले असून एक आरोपींना अटक करुन त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.दि. ३० जानेवारी रोजी फिर्यादी शुभांगी भुजंगराव जाधव वय ४० व्यवसाय - आरोग्य सेविका, उपकेंद्र बोकुड जळगाव, ता. पैठण यांनी बिडकीन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी नमूद केले की, दिनांक २९ जानेवारी रोजी संध्याकाळी ५:३० वाजल्यापासून ते ३० जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजेच्या दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी ओपीडी विभागातील डेस्कटॉप, मॉनिटर, यूपीएस आणि प्रिंटर असा एकूण ५६,५०० रुपये किमतीचा ऐवज चोरी करून नेला होता. त्यानुसार, बिडकीन पोलीसांनी गुन्हा क्रमांक ५५/२०२५ अंतर्गत कलम ३०५ ई भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे व सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेलके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी तपासाची चक्री वेगाने फिरवली असून अशी खात्री लायक बातमी मिळून अली की सदर गुन्ह्यातील आरोपी रोहित सुभाष नवगिरे व दिनेश प्रमोद राठोड दोघे रा. बोकुड जळगाव, ता. पैठण यांनी चोरी केल्याची खात्री पटली आहे,त्यानुसार, पोलीसांनी तातडीने कारवाई करत रोहित सुभाष नवगिरे याला ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत त्याने आणि त्याच्या साथीदाराने चोरीची केल्याची कबुली दिली. पोलीसांनी एक आरोपीस अटक करून त्यांच्या ताब्यातून डेस्कटॉप, मॉनिटर, यूपीएस आणि प्रिंटर असा ५६,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनाखाली बिडकीन पोलीसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे ही कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार, व पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कामगिरी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोउपनि मंजितसिंग सेना, सहाय्यक फौजदार जगन्नाथ उबाळे, पोलीस नाईक पवन चव्हाण, पोलीस अंमलदार दिनेश चव्हाण यांनी केली आहे. पुढील तपास जगन्नाथ उबाळे आणि पोलीस नाईक पवन चव्हाण करीत आहे.

# पैठण पोलिसांची अवैध वाळू तस्करी विरोधात कारवाई; १.३५ कोटींचा मुद्देमाल जप्त; २ आरोपी अटक तर ४ फरार





तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ : पैठण तालुक्यातील वडवाळी शिवारातील गोदावरी नदी पात्रात अवैध वाळू उपसा व वाळू चोरी करणाऱ्याच्या विरोधात पोलिस व महसूल प्रशासनाने संयुक्त कार्यवाही करत, जवळपास एक कोटी ३५ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कार्यवाहीत सहा जणांच्या विरोधात पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडवाळी शिवारात मोठ्या प्रमाणात वाळू चोरी होत असल्याची गुप्त खबर मिळाल्यावर, पैठण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख व महसुलचे नायब तहसिलदार राहुल बनसोडे यांच्या पथकाने संयुक्तरित्या वडवाळी शिवारात ३१ जानेवारीला मध्यरात्रीच्या सुमारास छापा मारला. यावेळी पोलीस व महसूल पथकाने या ठिकाणी वाळू चोरी करत असलेला, एक जेसीबी, एक हायवा, एक पांढर्या रंगाची बॉडी, निळ्या रंगाची ट्राली, एक दोन ब्रासचे वाहन विटकरी रंगाची बॉडी, फिक्कट पिवळसर रंगांची ट्राली असलेले विना क्रमांकाचे वाहन असे एकुण अंदाजीत १ कोटी ३५ लाखाचा मुद्देमाल जप्त केला. या वाळुचोरी प्रकरणी पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या फिर्यादीवरुन अरुण शहादेव बनसोडे, विष्णु विनायक शेजुळ, रमेश तुकाराम वीर, दत्ता उत्तमराव गाडेकर, विना क्रमांक वाहनाचे चालक मालक, विना क्रमांक हायवाचे चालक मालक ज्यांची नाव गाव माहीत नाही अश्या सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी नामे - अरुण शहादेव बनसोडे वय २१ वर्ष व्यवसाय जेसीबी ऑपरेटर अंतरवाली ता.शेवगाव जि. अहिल्यानगर तसेच दत्ता उत्तम गाडेकर वय - ३८ वर्ष व्यवसाय चालक रा.वडवळी ता. पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांना अटक करण्यात आली असून अन्य ४ आरोपी फरार आहेत कारवाईत पोलिस उपनिरीक्षक दशरथ बुरकुल, नागरगोजे, सुधीर ओव्हळ, अटोळे, अंधारे, आव्हाड, दिलवाले, तांबे, तथा नायब तहसिलदार राहुल बनसोडे, तलाठी निकम, कोतवाल दळवी आदींनी सहभाग घेतला.

# एमजीएम एसओईटी'चे जेस्टोपिया स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे 'जेस्टोपिया' हे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २८ जानेवारी २०२५ ते दिनांक ३० जानेवारी २०२५ दरम्यान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या संमेलनाचे उद्घाटन कुलपती अंकुशराव कदम आणि कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालिका डॉ.परमिंदर कौर, समन्वयक सारिका राठी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. क्रीडा स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, बॅटमिंटन, कॅरम, फुटबॉल, क्रिकेट आदि खेळांचा समावेश होता. यादरम्यान महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक - कर्मचारी यांचा एक क्रिकेटचा सामना भरविण्यात आला होता.

महाविद्यालयातील ९ अभियांत्रिकीच्या वर्गांनी भारतातील ९ विविध राज्यांची संस्कृती दाखवत त्या राज्यांची ओळख करून दिली. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये नृत्य, समूह नृत्य,गायन, फॅशन शो, बासरी वादन, पोवाडा आदि कार्यक्रमांसह गल्ली क्रिकेट, ट्रेजर हंट, टग ऑफ वॉर, संगीत खुर्ची, सॅक रेस आदि फन गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मिस मॅच डे आणि ट्रॅडिशनल डे ही या दरम्यान साजरे केले. पाण्याचे महत्व सांगणारा 'सेव्ह वॉटर' संदर्भातील मूक अभिनयही यावेळी सादर करण्यात आला.

विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (२८) **संकल्प**

डॉक्टर हेडगेवार जन्मजात देशभक्त होते. आणि श्री गोळवलकर गुरुजींचा दृष्टिकोन व्यापक, उदार व राष्ट्रीय होता. त्यांच्या दृष्टीने स्वयंसेवक चा अर्थ आहे स्व चे समर्पण, स्व ची आहुती. आपले संपूर्ण जीवन एका आदर्शासाठी या दोघांनीही समर्पित केले होते. त्यांनी आपल्या जीवनात विश्राम आणि विराम ला तिलांजली दिली होती.

डॉक्टर हेडगेवार म्हणायचे सर्व लोक आपले खाणे-पिणे भोजन-निवास- संतती या सर्वांच्या निर्मितीत व्यस्त आहेत. मग या देशाची निर्मिती कोण करणार? भारत मातेचे रक्षण कोण करणार? 'क्रियां सत्वसिद्धी नोपकारणे' म्हणजे क्रियेची सिद्धी एखाद्या उपकरणाद्वारे नाही तर महान विचार व विश्वासा द्वारे केलेल्या संकल्पामुळे होते. याच संकल्पानी डॉक्टरजींनी संघ स्थापना करून वटवृक्षाचे बीज पेरले. आणि मग डॉक्टरजी, गुरुजी व स्वयंसेवकांच्या निरंतर प्रयत्नातून वटवृक्ष साकारला. त्या बीजातून कार्याची गुरुता, कार्याची क्षमता, कार्याची पुण्यशीलता व त्यांच्या कार्यापासून लोकांना मिळणारा संतोष निरंतर वाढू लागला. आणि मग स्वयंसेवकांची या राष्ट्र कार्यासाठी श्रृंखला तयार झाली. ज्यामुळे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हे सिद्ध झाले आणि संघ यशस्वी वाटचाल करू लागला. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## लायन्स क्लब - द वन तर्फे लायन्स आयडॉल; गरजू विद्यार्थ्यांना संगणक देण्यासाठी उभारणार निधी

छत्रपती संभाजीनगर: येथील लायन्स क्लब ऑफ द वन तर्फे शैक्षणिक कामासाठी निधी उभारण्यासाठी लायन्स आयडॉल - २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रांत ३२३४ एच २ मधील सर्व लायन्स क्लबचे सदस्य सहभागी होऊ शकतात. याद्वारे जमा झालेल्या पैशातून संगणक घेऊन दिले जाणार आहेत, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष डॉ. अश्विनी जयस्वाल यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, ही स्पर्धा सर्व लायन्स सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी खुली असणार आहे. यामध्ये प्री क्वालिफिएड, क्वालिफिएड आणि ग्रँड फिनाले असे तीन राऊंड होतील. प्री क्वालिफिएड राऊंड मध्ये एक प्री रेकॉर्डेड व्हिडिओ १२ फेब्रुवारी पूर्वी पाठवावा लागेल. यात वोकल, सॉन्ग सिलेक्शन, वर्सेटिलिटी बघून निवडलेल्या सहभागी सदस्यांची निवड क्वालिफिएड राऊंड होईल. यामध्ये तीन मिनिटांचा एक व्हिडिओ शेअर करावा लागेल. यामध्ये गाणे मराठी किंवा इंग्लिश असावे लागेल. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांना वेळोवेळी माहिती दिली जाईल, असेही त्या म्हणाल्या. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. बालाजी बिरादार, अनण्या उपाध्याय, अभिषेक राज, शुभांकर डांगे, आशीष जयस्वाल आणि पूर्वा जयस्वाल परिश्रम घेत आहेत.

## पीएमश्री जि प के प्रा आदर्श शाळा केऱ्हाळा येथे स्वच्छता मोहीम



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त पीएमश्री जि प के प्रा आदर्श शाळा केऱ्हाळा तर्फे स्वच्छता फेरी काढून स्वच्छता मोहीम गावातील बाजारपेठ,छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, ग्रामपंचायत परिसर भागात राबविण्यात आली यावेळी शाळेतील ५०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. या मोहिमेचे उदघाटन सरपंच उषाताई कृष्णा पांढरे, माजी सरपंच अर्जुन वाघ, सदस्य सूर्यभान बनसोड, ग्रामविकास अधिकारी श्रीमती शेळके, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे, केंद्रप्रमुख शरद चव्हाण अंकुश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील पालक व शिक्षण प्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक रामचंद्र मोरे,भगवान राजपूत,शेख चांद,राजेंद्र बोडखे,माणिकराव काकडे,रमेश पवार, संभाजी पाटील, मोहम्मद झहिरोद्दीन, मोहम्मद एजाजोद्दीन, शेख नासिर,जुबेर अहमद,सुरेंद्र बबीरवाल,श्रीमती महानंदा राजपूत,रत्नकला इंगळे, रत्नमाला वाघ, अश्विनी जंजाळ, कविता तेली, अर्चना लोंढे,शारदा गुठे,यशोदा दुबेले,विभा मेश्राम,पूनम सोनवणे,सदफ देशमुख, बुशरा सुलताना,अनुराधा चव्हाण, शाहीन परवीन,केशव सागरे,संतोष एंडोले, गणेश शिंदे,अब्दुल वाहिद यांनी हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## खिंवसरा पार्क परिसरातील सिद्धिविनायक मंदिरात श्री.गणेश जयंतीच्या निमित्ताने गणेश याग संपन्न



छत्रपती संभाजीनगर : उल्कानगरीतील खिंवसरा पार्क मधील सिद्धिविनायक मंदिरात गणेश जयंतीच्या निमित्ताने यज्ञाचार्य वेदमूर्ती प्रशांत राजाभाऊ दाभाडकर गुरुजी यांच्या नेतृत्वात श्री.गणेश याग संपन्न झाला. श्री गणेश यागासाठी यजमान म्हणून श्री राजीव जहागीरदार श्री रमेश शिंदे श्री हेमंत वराडे श्री राजेश अग्रवाल व श्री पुंजाराम पजई सहकुटुंब बसले होते. शुक्रवार दिनांक ३१ जानेवारीला श्री गणेश पालखी सोहळा संपन्न झाला शनिवार दिनांक एक फेब्रुवारीला स्थापित देवता पूजन आणि अग्निस्थापनेनंतर श्री.गणेश जन्मसोहळा संपन्न झाला या तीन दिवसाच्या धार्मिक विधीसाठी श्री योगेश गोंदीकर गुरुजी श्री निलेश देव गुरुजी श्री अवधूत जोशी गुरुजी यांनी सहकार्य केले श्री.गणेश याग संपन्न करण्यासाठी मंदिर परिसरातील श्री. विश्वास पाटील श्री गौतम खरात श्री संतोष मल्ले श्री.हरिभाऊ पजई श्री. दिगंबर अंभोरे श्री शिवाजी साळुंखे यांनी मेहनत घेतली.

## ध्यानी ट्रेडव्हेंचर लिमिटेडने संचालक मंडळाच्या बैठकीत प्रमुख प्रस्तावांना मान्यता दिली

मुंबई : ध्यानी ट्रेडव्हेंचर लिमिटेड (बीएसई स्क्रिप कोड: ५४३५१६/ ध्यानीटर) ने शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत अनेक धोरणात्मक निर्णयांना मान्यता दिली. कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करणे आणि भविष्यातील वाढीच्या योजना सुलभ करणे हे या चरणांचे उद्दिष्ट आहे. कंपनीने सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३० चे पालन करून या घडामोडी सार्वजनिक केल्या आहेत अधिकृत भाग भांडवलात वाढ: कंपनीच्या अधिकृत भागभांडवलात १८ कोटी (१.८ कोटी इक्विटी शेअर्स, प्रत्येकी १०) वरून २४.५५ कोटी (२.४५५ कोटी इक्विटी शेअर्स, प्रत्येकी १०) वाढ करण्यास मंडळाने मान्यता दिली. ही वाढ भागधारकांच्या मान्यतेच्या अधीन असेल आणि ती असोसिएशनच्या मेमोरँडममध्ये देखील सुधारणा असेल. पर्यायी परिवर्तनीय कर्जरोखे जारी करणे: कंपनीने सेबी (आयसीडीआर) नियमावली, २०१८ च्या अध्याय पाच अंतर्गत प्राथमिक इश्यूद्वारे ७५ लाख अनगॅरंटीड, अनरेटेड आणि अनलिस्टेड ऑप्शनली कन्व्हर्टेबल डिबेंचर्स (ओसीडी) जारी करण्याची योजना आखली आहे.

संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# देशातही लागू व्हावा समान नागरी कायदा

उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा (युनिफॉर्म सिव्हिल कोड यूसीसी) लागू झाला आहे. असे करणारे उत्तराखंड हे देशातील दुसरे राज्य ठरले आहे. गोव्यात आधीपासूनच समान नागरी कायदा लागू आहे; मात्र तो गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता, तेव्हापासूनचा आहे. त्या अर्थाने समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड देशातील पहिले राज्य ठरते. समान नागरी कायद्याचा पुरस्कार भाजपा आधीपासूनच करत आहे. उत्तराखंडमध्ये भाजपाचे सरकार असल्यामुळे हे शक्य झाले आहे, हे नाकारता येणार नाही. उत्तराखंड सरकारने देशातील अन्य राज्यांसमोर विशेषत: भाजपाशासित राज्यांसमोर असे करत पथप्रदर्शक मार्ग घालून दिला आहे. घटनेतील अनुच्छेद ४४ अंतर्गत जी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत, त्यातील एक समान नागरी कायदा लागू करणे हे आहे. असे करत उत्तराखंड सरकारने घटनेतील आणखी एका मार्गदर्शक तत्त्वाची पूर्तता केली, असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळे उत्तराखंड सरकार आणि त्या राज्याचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांचे अभिनंदन केले पाहिजे. उत्तराखंडच्या पावलांवर पाऊल टाकत देशातील अन्य राज्ये आता समान नागरी कायदा आपल्याकडे लागू करण्याच्या दृष्टीने कामाला लागतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. आपल्या देशात खरं म्हणजे खूप आधीच समान नागरी कायदा लागू व्हायला पाहिजे होता. पण त्याची सुरुवात देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अतिशय छोटे राज्य असलेल्या उत्तराखंड सरकारने केली. त्यामुळे 'देर आये दुरुस्त आये' असे त्याचे वर्णन करायला पाहिजे. किमान यानिमित्ताने देशात त्याची सुरुवात झाली हेही नसे थोडके. देशात फौजदारी कायदे सर्व जाती-धर्मांच्या लोकांसाठी समान आहेत, त्यामुळे कोणत्याही जाती-धर्माच्या व्यक्तीने गुन्हा केला, तरी तिला फौजदारी कायद्यानुसार सारखीच शिक्षा होते. त्यात जाती-धर्माच्या आधारावर भेदभाव केला जात नाही. मात्र दिवाणी कायद्यानुसार असे होत नाही. विवाहविधी, संपत्ती हस्तांतरण आणि वारसाहक्क याबाबत मात्र प्रत्येक धर्माच्या लोकांना आपल्या धर्मातील तरतुदींनुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे याबाबतीतही समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात होती.

मुस्लिम व्यक्तीला चार महिलांशी विवाह करण्याची अनुमती आहे. हिंदू व्यक्ती मात्र एकापेक्षा जास्त महिलांशी विवाह करू शकत नाही. मुस्लिम व्यक्तीने चार महिलांशी विवाह केला तरी तो गुन्हा ठरत नाही; मात्र हिंदू व्यक्तीने पहिली पत्नी हयात असताना दुसऱ्या महिलेशी विवाह करणे हा गुन्हा ठरतो. त्यासाठी त्याला शिक्षाही होऊ शकते. त्यामुळे एकाच देशात राहणाऱ्या दोन भिन्न धर्माच्या व्यक्तींना दोन वेगवेगळे न्याय लावणे हे भेदभावपूर्ण तसेच अन्यायकारक ठरत होते. यातूनच समान नागरी कायद्याची मागणी रेटली जात होती. किमान उत्तराखंड सरकारने त्याची सुरुवात केल्यामुळे त्याचे अभिनंदन करायला हरकत नाही. मुस्लिमांचे तुष्टीकरण करत काँग्रेसने आतापर्यंत देशात राज्य केले. त्यामुळे मुस्लिमांच्या म्हणजे आपल्या व्होट बँकेच्या भावना दुखावतील, असा कोणताही निर्णय घेण्याची काँग्रेसची तयारी नव्हती. त्यामुळेच समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीने काँग्रेसने कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. मुस्लिमांच्या हितासाठी काँग्रेसने देशहिताला तिलांजलीही दिली होती. पण भाजपाची भूमिका पूर्णपणे याच्याविरोधात आहे. भाजपात आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी मी म्हणजे व्यक्तीचा विचार केला जातो. त्यामुळे व्यापक समाज आणि देशहितासाठी आवश्यक असलेला समान नागरी कायदा लागू करताना मुस्लिमांची मते आपल्याला मिळाली नाही तर मग काय, असा स्वार्थी विचार भाजपाने केला नाही. याचा अर्थ भाजपा मुस्लिमविरोधी आहे, असाही नाही. भाजपाने मुस्लिमांना न्याय दिला आहे. कारण 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' हे भाजपाचे राज्य कारभाराचे सूत्र आहे. त्यामुळे मुस्लिमांचे तुष्टीकरण न करताही भाजपाने कधीच त्यांच्यावर अन्याय होईल, अशी भूमिका घेतली नाही, तसा विचारही केला नाही. समान नागरी कायद्याला अनेक पैलू आहेत, जे अजून समोर आले नाहीत. या कायद्याचा फक्त मुस्लिमच नाही तर हिंदू, जैन, शीख आणि पारशी या धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांवरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्वांना काही गमवावे लागू शकते. मात्र काही तरी कमावण्यासाठी नेहमीच काही तरी गमवावे लागत असते. थोडे गमावून समाजाचा आणि देशाचा खूप मोठा फायदा होणार असेल तर असे गमावण्याचे कोणाला फारसे दु:ख होणार नाही. उलट आनंदाने सगळे यासाठी तयार होतील, यात शंका नाही. कारण हिंदू असो, जैन असो, शीख असो की पारशी या सर्वांचे प्राधान्य नेहमी व्यक्तिगत हितापेक्षा समाज आणि देशहितालाच राहात असते, याबाबत शंका नाही. उत्तराखंड सरकारने लागू केलेल्या समान नागरी कायद्यातून आदिवासी जमातींना वगळले आहे. त्याचे कारण त्यांच्या चालीरीती आणि संस्कृतीत आहे. कोणताही निर्णय घेताना त्यात काही अपवाद असतात, तसाच हा अपवाद समजायला हरकत नाही. मात्र यामुळे तेथे लागू झालेल्या समान नागरी कायद्याचे महत्त्व कमी होत नाही, हे नक्की.

घटनेतील अनुच्छेद ४४ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार सरकारने समान नागरी कायदा निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण असे मार्गदर्शक तत्त्वात म्हटल्यामुळे त्याची जबरदस्ती करता येत नव्हती. १९८५ मध्ये उद्‌भवलेले शहाबानो प्रकरण तसेच १९९५ च्या सरला मुद्‌गल प्रकरणाच्या सुनावणीतही सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली होती. उत्तराखंड सरकारने राज्यात समान नागरी कायदा लागू करत एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचेच पालन केले आहे, असे म्हणावे लागेल. उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू झाल्यामुळे काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील काही मित्रपक्ष त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे देशातील आणि उत्तराखंडमधील कट्टरपंथी मुस्लिम संघटनाही याला विरोध करण्याची शक्यता आहे. ऑल इंडिया रजा ॲक्शन कमेटीचे मौलाना अदनान रजा कादरी यांनी शरियतसोबत कोणत्याही प्रकारची छेडछाड खपवून घेतली जाणार नाही, सडकेपासून न्यायालयापर्यंत संघर्ष करण्याचा इशारा दिला आहे. व्यक्तिगत फायद्याच्या बाबतीत शरियतचा आग्रह धरणाऱ्या मौलाना अदनान रजा कादरी यांना या मुद्यावर दुटप्पी भूमिका घेता येणार नाही. जिथे फायदा आहे, तिथे ते शरियतचा आधार घेणार आणि जिथे नुकसान आहे, तिथे ते देशातील फौजदारी कायद्याच्या आड लपणार, असे चालणार नाही. व्यक्तिगत फायद्यासाठी शरियतचा आधार घेणाऱ्या मुस्लिमांनी फौजदारी गुन्ह्याच्या बाबतीतही शरियतने सांगितल्यानुसार शिक्षा भोगायची तयारी ठेवली पाहिजे. त्यांना या मुद्यावर सरसकट एक भूमिका घ्यावी लागेल, त्यांना एकाच वेळी तबल्यावर आणि डग्ग्यावर हात ठेवता येणार नाही. समान नागरी कायदा ही देशातील संविधानासोबत होत असलेली चेष्टा आहे, असेही रजा कादरी म्हणाले. कादरी साहेब, समान नागरी कायदा ही देशातील संविधानासोबत होत असलेली चेष्टा नाही, तुम्हीच आतापर्यंत आपल्या कृतीने देशातील संविधानाची चेष्टा आणि टिंगलटवाळी केली, ते पायदळी तुडवण्याचा प्रकार केला आहे. त्यामुळे तुमच्या तोंडी संविधान हा शब्द शोभत नाही. भारतीय संविधानावर ज्यांची श्रद्धा आणि विश्वास आहे, त्यांच्याच तोंडी संविधान हा शब्द शोभून दिसतो. मुस्लिम समाज या मुद्यावरून रस्त्यावर उतरून आपला मूळ स्वभाव दाखवल्याशिवाय राहणार नाही; मात्र त्यांच्या या दबावतंत्राला उत्तराखंड सरकारने तसेच केंद्रातील मोदी सरकारने बळी पडू नये. उलट ही संधी साधत देशातही समान नागरी कायदा लागू करत 'न रहेंगा बांस न बजेंगी बांसरी' अशी कठोर भूमिका घेण्याची वेळ आता आली आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# बुल्डोझ करण्याच्या लायकीचा मेंदू...

तुम्ही सर्वांनी अमिताभ बच्चन, रजनीकांत आणि गोविंदाचा 'हम' चित्रपट पाहिला असेलच. या चित्रपटामध्ये अनुपम खेर यांनी इन्स्पेक्टर गिरधर ही भूमिक साकारली आहे. इन्स्पेक्टर गिरधर लाळघोट्या, लबाड आणि स्वार्थी असतो. तो नेहमीच चेहरा हसरा ठेवतो, बोलतानाही तो हसत (लाळघोटेपणा करत) बोलतो. मात्र त्याच्या मनात काळंबेरं असतं. तो स्वार्थासाठी, पैशांसाठी कोणाशीही मैत्री करतो. मी तुमचाच वफादार आहे असं प्रत्येकाला दाखवण्याचा प्रयत्न करतो. पण मुळात तो कोणाचाच नसतो. तो स्वत:चाच असतो... स्वार्थी, लबाड, आतल्या गाठीचा... हा चित्रपट सुरुवातीला पाहताना असं वाटतं की बख्तावरची भूमिका साकारलेले डॅनी हे मुख्य खलनायक आहेत. पण चित्रपट जसजसा पुढे सरकतो, तसतसं कळतं की हा गिरधर सर्वांत मोठा खलनायक आहे. कारण वफादार होण्याचं नाटक करून तो बख्तावरलाच फसवतो. हा चित्रपट आणि गिरधर ही भूमिका आठवण्याचं कारण म्हणजे आज एक गिरधर आपल्या महाराष्ट्रामध्ये, भारतामध्ये मुक्तपणे वावरताना दिसतोय्. या खऱ्या आयुष्यातल्या गिरधरने दादर येथील मुंबईतील सावरकर स्मारक बुल्डोझ करा असं हिंसक, फासिस्ट आणि संविधानाच्या विरोधात विधान केलं आहे. या गिरधरच्या भाषणाचा व्हिडीओ युट्यूबवर उपलब्ध आहे.

हा गिरधर मुळात सगळ्या वैचारिक मंचावर फिरून डाव्या कंपूत घुसला आहे. सुरुवातीला हा पत्रकार म्हणून वावरत होता. नंतर अण्णा हजारेंच्या आंदोलनातही हा घुसला होता. पण अण्णा हजारेंनी हे बरोबर ताडलं की हा 'हम' चित्रपटातला गिरधर आहे आणि अण्णांनी त्याची हकालपट्टी केल्यानंतर आता कुठल्या फांदीवर जाऊन बसायचं या विचारात असतानाच नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. मग समाजवादाचा बुरखा घालून फिरणाऱ्या या गिरधरने भगवा टिळा लावला आणि टुणकन उडी मारून हिंदुत्वाच्या विशाल सागरात झेप घेतली. याने मोदींवर स्तुतिसुमने उधळायला सुरुवात केली. पण कुणीच भीक घालेना. कारण हिंदुत्वाच्या विशाल सागरात खऱ्याखुऱ्या देशभक्तांच्या समृद्ध नौका आहेत. चाचेगिरी करणाऱ्या गिरधरची नौका तग धरू शकली नाही आणि नोटबंदीनंतर ही नौका बुडाली. मग याने टुणकन डाव्या कंपूत उडी घेतली. आता हा गिरधर डाव्या मंडळींमध्ये ब्राह्मण म्हणून हिंडतो. हिंदुत्ववाद म्हणजेच ब्राह्मणवाद असं सांगून डाव्या लोकांमध्ये लाळघोटेपणा करून आपलं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतोय्. ज्या व्हिडीओमध्ये या गिरधरने सावरकर स्मारक बुल्डोझ करण्याचं विधान केलंय, त्यात त्याने ब्राह्मण जातीला प्रचंड दूषणे वाहिली आहेत. जणू ब्राह्मण ही जात मानवजातीची शत्रू आहे, अशाप्रकारे हा गिरधर या जातीची बदनामी करत असतो. पण लक्षात ठेवा, याला कशाशीच काही देणं घेणं नाही. कारण गिरधर हा स्वार्थी असतो, त्याचा इमान फक्त स्वत:च्या तिजोरीशी आहे. उद्या पुरोगामी कंपूतून याला हाकलून लावलं तर हा पुन्हा दुसऱ्या कंपूत शिरून तिथे लाळघोटेपणा करेल.

आता आपण गिरधरने सावरकर स्मारकावर केलेल्या विधानाकडे वळूया. याचं म्हणणं असं की मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महापुरुषांची स्मारके उभी राहायला हवीत. सावरकर स्मारक कुठून आलं? असा प्रश्न याच्या दूषित मेंदूला पडला आहे. तर नि:संशय छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारके मुंबईतच काय तर जगभरात उभारायला हवीत. कारण हे महापुरुष अनुकरणीय आहेत. मात्र गिरधर ज्या विचारांचा आहे, त्यात या दोन्ही महापुरुषांना स्थान नाही. गिरधर वरवर पाहता अहिंसेची भाषा करत असला तरी याच्या पूर्ण भाषणातून हा संविधानाच्या विरोधात जायला सांगतो. याला संघावर बंदी हवीय्, सावरकरांचं स्मारक तोडलेलं हवंय्. हाच पुरोगाम्यांचा खरा चेहरा आहे. या भाषणाचा विषय मनुस्मृती की संविधान असा होता. मुळात किती हिंदूंनी मनुस्मृती वाचली आहे? गिरधरनेही वाचली नसेल. मनुस्मृती आजच्या आधुनिक हिंदूंचे श्रद्धास्थान नाही, हे सत्य आहे. पण मनुस्मृतीला जिवंत ठेवण्याचं काम गिरधरसारखे स्वयंघोषित पुरोगामी लोक करत असतात. कारण मनुस्मृतीमुळे यांचं 'दुकान' चालतं.

दादर येथील स्वा. सावरकर स्मारक हे सर्वसामान्य सावरकरवाद्यांच्या कष्टातून उभारलेले आहे. जातीयवादाची बेडी मोडून एकत्वाची जाणीव करून देणारं हे राष्ट्रीय तीर्थस्थळ आहे. स्वा. सावरकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा समृद्धपणे चालवला आणि हा गिरधर हे दोन्ही महापुरुष वेगळ्या विचारांचे असल्याचे दाखवतोय्. या माणसाच्या मनात जात इतकी भिनली आहे की 'मी ब्राह्मण आहे' असं सगळीकडे सांगत फिरतो. मुळात सावरकर खऱ्या अर्थाने पुरोगामी होते. सावरकर केवळ क्रांतिकारक नव्हते, राजकारणी नव्हते तर समाजसेवक, समाजसुधारकही होते. समाजातील रंजल्या गांजलेल्या लोकांसाठी सावरकर पुढे सरसावले होते. पण दुर्दैव असे की सावरकरांच्या जीवनाचा हा अध्याय लोकांसमोर प्रकर्षाने आला नाही. सावरकरवाद्यांनाही तो मांडता आला नाही, हे मान्य करावेच लागेल ना! सावरकरांचे रत्नागिरीतील सामाजिक कार्य खूप थोर आहे. त्यांचे कार्य पाहून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनीही प्रशंसा केली आहे. ज्ञानेश्वरांचा वैश्विक धर्म सावरकरांना मान्य आहे. श्रीकृष्णाचं 'वसुधैव कुटुंबकम्' हे तत्त्व सावरकरांनी स्वीकारलेलं आहे. मात्र 'हे विश्वचि माझे घर' ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी जगाला बेचिराख करण्याची मनीषा ठेवणाऱ्या, माझाच देव खरा-तुमचा देव खोटा असं म्हणत जगाला कब्रस्थान बनवण्याची आकांक्षा ठेवणाऱ्या विचाराविरुद्ध प्रतिकार केल्याशिवाय वैश्विक धर्माची संकल्पना रुजू शकणार नाही, ज्ञानदेवांचे पसायदान आकार घेऊ शकणार नाही. म्हणूनच भगवान श्रीकृष्ण आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्त्वाचे अनुसरण करून हिंदू धर्माचा ध्वज फडकवूनच वैश्विक धर्माची स्थापना करता येणार आहे, याचे भान सावरकरांना होते. आंबेडकर आणि सावरकर, बुद्ध आणि कृष्ण असा वाद पुरोगामी मंडळी पेटवण्याचा प्रयत्न करतात. पण हे एकच तत्त्व आहे. गंतव्य एकच आहे, मार्ग वेगळे असतील. त्यामुळे सावरकरांचे विचार मुळातून समजून घेतले पाहिजेत. त्यांचे विचार गिरधरने नक्कीच वाचले आहेत. पण हा लबाड गिरधर अर्धवट आणि खोट्या गोष्टी सांगून लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करतोय्. २०१४ साली हा सावरकरांची स्तुती करत होता. कारण 'हम' चित्रपटाप्रमाणे गिरधर हा बख्तावरचाही (डॅनी) नाही आणि टायगरचाही (बच्चन) नाही. त्यामुळे सावरकर स्मारक बुल्डोझ करण्याचा विचार ज्या मेंदूतून आला, खरं तर तो मेंदूच बुल्डोझ करण्याच्या लायकीचा आहे. पण हिंदुत्वात बुल्डोझ करण्याची परंपरा नाही. तोडण्याची-मोडण्याची-फाडण्याची परंपरा वाळवंटातून आली आहे. आपली परंपरा उभारण्याची आहे, फुलवण्याची आहे. जरी गिरधरचा मेंदू बुल्डोझ करण्याच्या लायकीचा असला तरी तो शाबूत राहिला पाहिजे. कारण त्यामुळे लोकांचे मनोरंजन होत असते. आणि मुलांवर संस्कार करण्यासाठी सुद्धा उपयुक्त ठरत असते. 'आयुष्यात कसे व काय व्हायचे नाही', याचे उत्तम उदाहरण म्हणजे गिरधर. एवढ्यासाठी का होईना, गिरधर उपयुक्त आहे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# धार्मिक यात्रेतून सामाजिक सलोखा

प्रयागराज येथे महाकुंभ सुरू आहे. या महाकुंभाचे आयोजन भव्य दिव्य आहे. तेथे अनेक भाविक मोठ्या श्रद्धेने येऊन गंगेत पवित्र स्नान करत आहेत. भारतातीलच नव्हे, तर जगभरातील हिंदू बांधव आणि विविध धर्मांतील लोक या अमृतकुंभाचा लाभ घेत असतानाच, वर्धा जिल्ह्यातील तरोडा या लहान गावातही छोट्या प्रमाणात असलेला, पण भक्ती आणि श्रद्धेत कुठेही कमी नसलेला संतमेळा मागील आठवडाभर सुरू होता. त्याची सांगता शनिवारी पहाटे प्रक्षाळपूजेनंतर झाली. अनेक थोर पुरुषांच्या स्पर्शाने पवित्र असलेल्या वर्धा जिल्ह्यात केजाजी महाराजांचे आगमन झाले आणि तेथील लोकांनी त्यांना आपलेसे करून घेतले. लोकांच्या आदरातिथ्याला ते नाकारू शकले नाहीत. अशा लोकानुनय केजाजी महाराजांची पुण्यतिथी तरोडा येथे मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. मागील काही दिवस तरोडा गाव संतांच्या मांदियाळीने फुलून गेले होते. आठवडाभर संतांचे कीर्तन, नामजप, टाळ, मृदंग, हरिनाम यांचा अखंड अमृतप्रवाह सुरू होता. यानिमित्त येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी कुणालाही आमंत्रणाची गरज पडत नाही. कुणाचे औपचारिक आगतस्वागत होत नाही. तरीही इतर गावांतील लोक महाराजांच्या आशीर्वादासाठी येथे येतात आणि भक्ती-सागरात स्नान करतात. आठवडाभर तर गावात अक्षरश: चहलपहल होती. गावात दसरा, दिवाळीसारखे वातावरण होते. केजाजी महाराजांच्या मंदिरावर विद्युत दिव्यांची आकर्षक रोषणाई केलेली होती. मंदिर परिसरात मंडप टाकून तेथे कीर्तनकारांची प्रवचने झाली. यात समाजातील सर्व प्रकारचे लोक सहभागी झाले होते. गावाच्या प्रत्येक घरातील व्यक्तीचा उत्सवात सहभाग होता. गरीब, श्रीमंत, जातपात याला कुठेही थारा नव्हता. प्रत्येक जण केजाजी महाराजांच्या ओढीने एकत्र आले होते. माझाही काही या उत्सवात सहभाग असावा म्हणून प्रत्येक जण सेवा अर्पण करत होता.

गावातून लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली उत्सवाच्या निमित्ताने एकत्र आल्या होत्या आणि जुन्या मैत्रिणींच्या भेटीने आनंदून गेल्या. विशेष म्हणजे मोठ्या लोकांच्या मार्गदर्शनात या उत्सवात तरुणांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कुठेही तरुणाईचा उन्माद नाही, होता फक्त उत्साह. मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वच जण कामात व्यस्त होते. उत्सवाच्या यशस्वितेसाठी झटत होते. कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेत होते. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी गोपालकाल्याचे कीर्तन झाल्यानंतर दहीहंडी झाली. यात दहीहंडी फोडल्यानंतर प्रत्येक जण एकमेकांवर दही उडवत होते, त्याचा प्रसाद म्हणून स्वीकार करत होते. आठवडाभराच्या उत्सवात रोज कीर्तनातून समाजप्रबोधन होत होते. यात श्रोत्यांमध्ये मोठ्यासंह तरुणांचा सहभाग सर्वाधिक होता. कीर्तनाच्या माध्यमातून आपल्या संतांची थोरवी ते ऐकून घेत होते. या कीर्तनकारांना, साधुसंतांना शेवटच्या दिवशी बिदागी देण्यात आली आणि त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. उत्सवाची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. यात कुठेही खंड पडला नाही. उलट यात तरुणांचा सहभाग वाढत आहे. महाप्रसादाला तर तरुणांचा सहभाग पाहण्यासारखा असतो. सर्व जण जमिनीवर बसून भोजन घेत होते. एक पंगत उठली की दुसरी पंगत बसण्याअगोदर उष्ट्या पत्रावळी उचलून झाडून पुन्हा भोजनासाठी जागा तयार करण्यात येत होती. यात कुठेही कुणाचेही उणेदुणे काढत नव्हता. अशा सहभागातून सामाजिक सलोख्याची भावना प्रबळ होत होती.

या उत्सवाच्या निमित्ताने शेजारच्या गावातील, नागपूरसह अनेक शहरातील लोक येथे भेट देतात आणि यात्रा म्हटली की दुकाने आलीच. त्यानुसार वेगवेगळ्या साहित्याची, खाद्यपदार्थांची दुकाने येथे मोठ्या प्रमाणात थाटली होती. अनेकांना रोजगार मिळाला. हातात पैसा खेळत असल्याने आनंद दुणावला होता. आधुनिकीकरणाच्या काळात यात्रेत काही बदल झाले, पण ते स्वीकारणेही आवश्यक आहेत. पारंपरिक पदार्थांसह चिनी खाद्यपदार्थांचीही दुकाने मोठ्या प्रमाणात होती. पण गावातील आर्थिक बळकटीसाठी ते स्वीकारल्याशिवाय पर्याय नाही. यात्रेच्या निमित्ताने बैल बाजारही लागला होता. यात अनेक प्रकारच्या बैलांची खरेदी-विक्री झाली. बैल खरेदीची प्रक्रिया अनुभवणे मोठे रंजक असते. तो अनुभवही अनेकांनी घेतला. यात्रेच्या निमित्ताने विविध प्रकारचे लोक एकत्र येत असल्याने सामाजिक एकरूपता साधली जाते. सर्वच जण सर्वांमध्ये एकरूप होतात आणि एकात्मतेची भावना वाढीस लागते. हा संदेश केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने सर्वांना आला. गावाच्या प्रवाही, निर्मळ, स्वच्छ वातावरणात, मानवतेच्या विचारांचा अमृतकुंभ कायम राहावा, हीच अपेक्षा.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सर्व काही शांत हीच अशांतता!



केंद्रात वाटा नाही, उलट केंद्र सरकार विरोधात, राज्यात वाटा नाही, उलट राज्य सरकार विरोधात, मुंबई महापालिकेत कधीचेच बाहेर आहेत. आता निवडणुका कधी होतील याची शाश्वती देखील नाही. झाल्यातरी उबाठा सत्तेत येईलच याचीही शक्यता धूसरच आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना आता आपले उरलेले ९ खासदार आणि २० आमदार कसे टिकवायचे याची चिंता लागली आहे. या हताशेतून, उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे विश्वप्रवक्ते संजय राऊत या दोघांची अलिकडल्या काळात जाहीर होत चाललेली घालमेल, कालवाकालव यातून त्यांची अस्वस्थता लक्षात येते. मुळात ही घालमेल आणि अस्वस्थता केवळ सत्तेत सहभागी होण्यासाठीची आहे. सतत प्रयत्न करून देखील भाजपा मात्र, यांना ताकास तूर लागू देत नसून, सरकार शांत आणि संयमाने अग्रेसर होताना दिसत आहे. सरकारचं कामकाज शांततेत चाललं असल्यामुळे ''सर्व काही शांत शांत त्यामुळेच ठाकरेंचं मन अशांत'', अशी ठाकरे ॲण्ड कंपनीची परिस्थिती झालेली आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना आणि भाजपाची २५ वर्षांची युती तुटली, नव्हे मुख्यमंत्रिपदाच्या मोहापोटी उद्धव ठाकरेंनी निवडणुकीपश्चात तोडली. भाजपासोबत निवडणूक युतीत लढली आणि गद्दारी करत युती तोडून उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर हातमिळवणी केली. रडत रडत अडीच वर्षे कशीबशी निघाली आणि एकेदिवशी एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेत उभी फूट पडल्याने महाविकास आघाडीचं सरकार कोसळलं. परिणामी नाईलाजाने उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. पदावरून पायउतार करण्यात भाजपाचाच हात असल्याचा समज करत, उद्धव ठाकरे यांनी सातत्याने भाजपाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करण्याचा धंदा चालवला. तसं तर, हा प्रकार ठाकरे ॲण्ड कंपनीने २०१९ मध्ये भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून युती तोडत काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेल्यानंतर लगेचच सुरू केला होता. पण तेव्हा तो विजयाचा उन्माद होता. त्यानंतर २०२२ मध्ये सत्ता असताना, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या नाका खालून आमदार पळवून, उद्धव ठाकरेंना खुर्चीतून अपमानास्पदरीत्या खाली खेचत सत्तेतून बेदखल केले आणि भाजपासोबत सरकार स्थापन केले. त्यामुळे एक आपला नोकर, चपला उचलायचा सोडून, माझी अर्थात मालकाची सत्ता उलथवून गेला. या धक्क्यातून ठाकरे सावरले नाहीत. त्यांना झोंबलेली मिरची बदल्याच्या भावनेतील उत्युच्च शिखरावर घेऊन गेली. मग काय सूड सूड आणि सूड उगवायचा... अशीच यांची बोल भाषा नेहमी राहिली. त्यानंतर गद्दारांना धडा शिकवायला निघालेल्या ठाकरेंना लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशानंतर तर हे कुठेच मावेनासे झाले होते. तरीही तो विजय केवळ ०.४२ टक्के मतांच्याच फरकाचा होता. मात्र, मोठा विजय असल्याने आता निवडणूक लागण्यापूर्वीच राज्यात आपली सत्ता येणारच, नव्हे आलीच आहे अशा भावनेतून, दिल्लीपासून, गल्लीपर्यंत उद्धवसाहेबांनी मुख्यमंत्री मला करा, यासाठी चपला झिजवल्या. जणू निकाल लागले, बहुमत आलं आता केवळ सरकार स्थापन करायचं तेवढं राहिलं असल्याच्या नंदनवनात वावरताना ते दिसत होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत त्यांचा अहंकार महाराष्ट्राच्या जनतेने चक्काचूर केला. केवळ २० जागा कशाबशा त्यांच्या वाट्याला आल्या. त्याचवेळी धडा शिकवायला निघालेल्या, ठाकरेंच्या लेखी गद्दार असलेल्यांना ५७ जागा देत भक्कम पाठिंबा महाराष्ट्राच्या जनतेने एकनाथ शिंदेंना दिला. आता शिंदेंचं राजकीय भविष्य भाजपासोबत उज्ज्वल दिसत आहे. दुसरीकडे शरद पवारांनी १९७८ मध्ये केलेल्या गद्दारीचा कित्ता उद्धव ठाकरेंकडून २०१९ मध्ये गिरवून घेत, महाराष्ट्रात पुन्हा सत्तेत येण्याचा डाव यशस्वी केला. मात्र, शरद पवारांच्या या खेळीने उद्धव ठाकरेंच्या पक्षाच्या जीवावर बेतेल याची किंचितही कल्पना ठाकरेंना आली नाही. ते खुर्ची आणि पुत्र मोहात गेले. ठाकरेंची हीच नस पकडत अर्थात फायदा घेत पवारांनी स्वत: सत्तेत येण्याचा डाव रचला आणि तो यशस्वी देखील झाला. हे करत असताना पवारांनी मात्र, 'बॅक डोअर डिप्लोमसी' सुरूच ठेवली. त्यांनी भाजपासोबत चर्चेसाठीचा एक दरवाजा सुरू ठेवला. मात्र, त्याचवेळी पवारांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या ठाकरेंनी भाजपासोबत थेट दुश्मनी घेतली. आता शरद पवार, सुप्रिया सुळे आणि त्यांचे नेते भाजपा नेत्यांसोबत थेट भेटतात संवाद साधतात. मात्र, त्याचवेळी ठाकरे ॲण्ड कंपनीला भाजपानेते फाट्यावर मारत असल्याचे चित्र दिसते. अशा परिस्थितीत आता सत्तेत नव्हे तर किमान राज्याच्या राजकारणात टिकून राहायचे असेल तर, भाजपासोबत जुळवून घेतले पाहिजे असे आता उद्धव ठाकरेंना कळून चुकले आहे. त्यामुळे आता भाजपासोबत जाण्यासाठी, ज्या मुखपत्रातून टीका करता करता दिवसं लोटली त्यातून कौतुक केलं जात आहे. एका भाजपा आमदाराच्या लेकीच्या लग्नात चंद्रकांत पाटलांनी शिष्टाचार म्हणून दोन शब्द गोड बोलले काय तर, यांच्या आशा एकदम पल्लवित झाल्या. पण भाजपाला शिंदेंची गरज नसली तरी, युतीत दिलेला शब्द आणि बांधिलकी जपणार आणि शिंदेंना कधीही सोडणार नाही असेच संकेत ते देत आहेत.

बरं ठाकरेपेक्षा माध्यमांनाच ठाकरेंचं भाजपासोबत सूत जुळविण्याचा अतिउत्साह आहे. फडणवीस, ठाकरे लिफ्टमध्ये भेट, लगेच भाजपा-उबाठा एकत्र येणारच्या बातम्या सुरू, ठाकरे, फडणवीसांच्या भेटीला... भाजपा-उबाठा छुपी युती, बातम्या सुरू, चंद्रकांत पाटील हसून बोलले, अनेकांच्या भुवया उंचावल्या... बातम्या सुरू. पण वस्तुस्थिती, अमित शाहांनी शिर्डीच्या आपल्या भाषणातून स्पष्ट केली. कितीही लाईन लावा, यांचा नंबर लागणार नाही, हीच वस्तुस्थिती आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### विकासासोबतच अस्तिनीतल्या सापांवर कारवाई हवीच

भारतातले हिंदू सहिष्णू आहेत. त्यांच्या याच गुणांमुळे भारतावर म्लेंच्छ, पोतुर्गीज, मोगल, इंग्रजांनी आक्रमणे केलीत व येथील संस्कृतीचे अतोनात नुकसान केले. पर्यायाने जागतिक शांततेला सुद्धा धक्का पोहोचला. कुठल्याही प्रकारचे नियंत्रित वा प्रसार करणारी संघटना नसतानाही हिंदू धर्म जगात लोक आपणहून अवलंबित आहेत. हिंदूची शांततामय संस्कृती लोकांना भावते व लोक आकर्षित होतात.

पण या सहिष्णुतेचा फायदा काही हिंसक लोक घेतात. भारतात घुसखोरी करणारे काही परदेशी नागरिक उदात्त हेतूने येत नाहीत, भारतीय संस्कृतीविषयी त्यांना कवडीचेही प्रेम नाही. उलट काही काळानंतर येथे उत्पात करणे, हेच त्यांचे ध्येय असते. हे स्पष्ट माहीत असूनही सरकार अशा समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई का करत नाही, हे एक कोडेच आहे. अशा मवाळ धोरणांमुळे छुपे भारतद्वेषी व भ्रष्टाचारी यांचे फावते व उपद्रवी घुसखोरांना ते नकली कागदपत्रे बनवायला मदत करतात. बहुसंख्य भारतीयांची मागणी आहे की असे अस्तिनीतले साप असलेल्या राष्ट्रद्रोही लोकांवर सरकारने कुठलाही मुलाहिजा न ठेवता कठोर कारवाई करावी व देशावर येऊ घातलेले संभाव्य संकट टाळावे. विकासाबरोबरच अशा कारवाईला सरकारने विनाविलंब प्राथमिकता द्यावी.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

### प्रसार माध्यमांचे हिंदुद्वेषी स्वरूप !

१४४ वर्षांनी येणाऱ्या या महाकुंभमेळ्याचे दैवी महत्त्व सूर्य आणि गुरू ग्रह यांच्या विशिष्ट राशींमधील योगावर आधारित आहे. या अभूतपूर्व मेळ्याने भारताची सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा जागतिक स्थरावर पोहचवण्याची सुवर्णसंधी निर्माण केली आहे.

महाकुंभमेळा केवळ हिंदू धर्मासाठीच नव्हे, तर मानवी जीवनात अध्यात्माचे महत्त्व सांगणारा सोहळा आहे. जगभरातील जिज्ञासू, भक्त आणि साधक या मेळ्याला उपस्थित राहून आध्यात्मिक अनुभूती घेतात. तरीही, काही विदेशी प्रसारमाध्यमे यांचा महाकुंभमेळ्याविषयी नकारात्मक दृष्टिकोन असणे चिंतेचा विषय आहे. नागा साधूंवर होणारी टीका आणि कुंभमेळ्याचे विकृत चित्रण हा भारतीय संस्कृतीवर झालेला दुर्दैवी हल्लाच आहे.



वारेमाप प्रसिद्धीसाठी महाकुंभमेळ्यात काही व्यक्तींवर माध्यमांनी केंद्रित होणे, ही आध्यात्मिक घटनेच्या मूळ उद्देशाला बाधा आणणारी बाब आहे. कुंभमेळ्याचा मूळ उद्देश 'धर्म' आणि 'मोक्ष' यांचे महत्त्व अधोरेखित करणे आहे, 'अर्थ' आणि 'काम' यांचे नव्हे. माध्यमांनी आपल्या उथळ विचारांवर नियंत्रण ठेवून या महोत्सवाचे खरे सौंदर्य आणि आध्यात्मिक मूल्य जगासमोर मांडणे आवश्यक आहे. महाकुंभमेळा ही भारताची सांस्कृतिक परंपरा आणि आध्यात्मिक साक्ष आहे. ही घटना भारताची पत उंचावणारी आहे आणि तिचा योग्य सन्मान राखणे, तसेच प्रसारमाध्यमांनी प्रामाणिक दृष्टिकोन ठेवणे हे अत्यावश्यक आहे. ईश्वर कृपेने जागृत हिंदू संघटना, संत, महंत, भक्तांनी मिळून प्रसार माध्यमांना वेळीच आवर घालण्यासाठी भाग पाडले. देशातील सुज्ञ नागरिकांनी अशा प्रकारच्या हिंदुद्वेषी प्रसार माध्यमांकडे लक्ष न देता कुंभमेळ्याचा आध्यात्मिक लाभ करून घ्यावा ही विनंती. तसेच अपप्रचार करणाऱ्या प्रसार माध्यमांना चोख उत्तर देणे आवश्यक आहे. जेणे करून पुन्हा अशी कृती करण्यास कुणी धजावणार नाही.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

●● ●●

### सदैव सकारात्मक असावे

समाजात आज नकारात्मकता मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. बालपणापासून ते वृद्धांपर्यंत पदोपदी व क्षणोक्षणी प्रत्येक बाबतीत नकारात्मकता वाढलेली दिसून येत आहे. व्यक्ती जीवनातील ही नकारात्मकता त्या व्यक्तीच्या दैनंदिन व व्यावहारिक जीवनावर अनिष्ट व घातक परिणाम करते. नकारात्मक वृत्तीने व्यक्ती नैराश्य अवस्थेत राहते. यामुळे नको त्या जीवघेण्या आजाराला बळी पडते. नकारात्मकतेने मन:स्थिती अस्थिर बनते व दैनंदिन कामे, व्यावहारिक कामे, कौटुंबिक कामे यात मन रमत नाही. शारीरिक,



मानसिक, भावनिक, वैचारिक दुर्बलता जडते व व्यक्ती कमालीची दुबळी व दुर्बल बनते. यास्तव समाजातील प्रत्येकाने जे आहे त्यात समाधान, सुख व आनंद मानावा. नित्य गोष्टी, नित्य कामे, सुस्थिर मन व्यक्तीला भरभरून सुख, समृद्धी व वैभव देतात. अनित्य व अनिष्ट गोष्टी माणसाला सदैव दु:ख, पीडा व असमाधान देतात. यासाठी माणसाने सदैव सकारात्मक असावे, आशावादी असावे, आनंदी असावे, समाधानी असावे. यामुळेच तो सुखी व समाधानी राहू शकतो, हे नक्की.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उपमुख्यमंत्री शिंदे यांची ६ फेब्रुवारी रोजी सभा



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ फेब्रुवारी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दि. ६ फेब्रुवारी रोजी आभार सभा आयोजीत करण्यात आल्या असल्याची माहिती शिवसेना आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील नवीन मोंडा मैदानावर दुपारी १ वा. सभा आयोजीत करण्यात आली आहे. या सभेत जवळपास पन्नास हजार लोक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी दिलेल्या प्रेमाचे आभार मानन्यासाठी ही सभा आयोजीत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ९ वा. आगमण होणार आहे. १ वाजता सभा तर सा. ६ वाजता स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भाने पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजण करण्यात आली आहे. या सभेस लाडक्या बहिणींनसह भावांनी देखली उपस्थित राहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेत बालाजीराव खतगावकर, डॉ. अंकुश देवसरकर, संपर्कप्रमुख दत्तात्रय पइतवार, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख विनय गिरडे, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख आदिंची उपस्थिती होती.

# निवघा बाजार परिसरातून हजारो ब्रास रेतीचा अवैध उपसा

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बाजार,दि. ०१ फेब्रुवारी**

ग्रामीण भागात दुर्गम भागात चालू असलेल्या विकास कामांना व घरबांधणी करीता धानोरा बोरगाव, हस्तर मारले गांव येथील उपनदीच्या ठेक्यातून दररोज दिवस रात्र पधरा ते वीस ट्रॅक्टरच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू उपसा करून रेती गौण खनिजापासून शासनाने मिळणारा लाखो रुपयाचा महसूल लालची



वृत्ती असलेल्या अधिकाऱ्यांच्या लालसे पोटी पाण्यात जात आहे. रेती माफियांकडून अव्वाच्या सव्वा भावामध्ये बांधकाम धारक नागरिकांना आपली गरज भागवण्यासाठी रेती घ्यावी लागत आहे.

या बाबीमुळे गरजवंत नागरिकांची आर्थिक पिळवणूक केल्या जात आहे. तेव्हा जिल्हा प्रशासनाने या बाबीकडे लक्ष देऊन संबंधित महसूल विभागातील अधिकाऱ्यांची महसूल विभागाच्या दुर्लक्षपणामुळे शासनाचा महसूल पाण्यात चौकशी करावी व या भागात चालत असलेला अवैध रेती उपसा थांबवावा, अशी मागणी होत आहे. अव्वाच्या सव्वा किमतीमध्ये गरजू बांधकाम धारकांना विक्री करून अवैध वाळू उपसा करणारे माफीया आपली पोळी भाजून घेत आहेत.

निवघा बाजार परिसरातून उपनद्यांमधून दिवस-रात्र परिसरातील पंधरा ते वीस खासगी ट्रॅक्टर, जेसीबीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करून ग्रामीण भागात विक्री करीत आहेत. ही बाब संबंधित सज्जातील तलाठी मंडळ अधिकारी यांना माहीत असूनही हप्ते घेऊन गप्प बसत आहेत अवैध विनापरवाना रेतीमाफीयाकडे नजर अंदाज करित आहेत. महसूल विभागाने आजपर्यंत या भागातून कठोर दंडात्मक कारवाई एकाही वाळूमाफियावर केली नसल्याने नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा होत आहेत.

# काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीतून प्रदेश अध्यक्ष पांच्यावर आरोप : पावडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ फेब्रुवारी**

काँग्रेसच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी राजेश पावडे यांची निवड प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी केलेली होती ते या पदासाठी सक्षम असताना जिल्ह्यातील गटबाजीमुळे काही पदाधिकाऱ्यांनी त्याच्या निवडीला विरोध केला त्यामुळे निवडीस तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे जिल्ह्यातील काँग्रेसच्या केवळ गटबाजीमुळे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्यावर आरोप करून त्यांनी घेतलेल्या निर्णयाला पदाधिकाऱ्यांनी स्थगिती घेणे योग्य नसल्याची भूमिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस राजेश पावडे व प्रदेश सरचिटणीस केदार पाटील साळुंके पानी मांडली.

नांदेड जिल्हा काँग्रेसमध्ये काँग्रेसचे नेते पक्ष बदलून गेल्यानंतर तातडीने काँग्रेस पक्षाचे दोन प्रभारी जिल्हाध्यक्ष दक्षिण व उत्तर निवडण्यात आलेले होते त्यात नांदेड दक्षिण हनमंतराव पाटील बेटमोगरेकर तर उत्तरसाठी बी आर कदम यांची निवड करण्यात आलेली होती त्यानंतर लोकसभेची उमेदवारी वसंतराव चव्हाण यांना देण्यात आली लोकसभा निवडणूक झाली विधानसभेच्या निवडणुका झाल्या त्यात विधानसभेच्या जिल्ह्यातील सर्वच जागा काँग्रेसने हरल्या मात्र लोकसभेला खासदार रवींद्र चव्हाण अल्पशा मताने निवडून आले. जिल्ह्यातीत येणाऱ्या निवडणुकीसाठी प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी नांदेड जिल्ह्यातील नांदेड उत्तर मधील प्रदेश सरचिटणीस असलेल्या राजेश पावडे यांना उत्तर जिल्हा अध्यक्ष असलेल्या बि. आर. कदम यांच्या जागी अध्यक्ष तर बि आर कदम याना राजेश पावडे पाच्या जागी प्रदेश सरचिटणीस असा खांदेपालट केला या निर्णयाचे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यानी स्वागत करणे आवशक आसताना प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले याच्यावर नांदेड जिल्ह्यातील अंतर्गत गटबाजीतून पैसे घेऊन पदे दिल्याचा आरोप करून त्यांच्या निवडीला स्थगिती घेतलेली असल्याचे मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस राजेश पावडे, प्रदेश सरचिटणीस केदार पाटीत साळुंके सह माधवराव पाटील पवळे, गणेश पाटील ढगे, सत्यपाल सावत, अनिल पाटील चिमेगावकर, आदींनी व्यक्त केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीला गतीमान करणारा अर्थसंकल्प: खा. अशोक चव्हाण

**नांदेड**-केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला यंदाचा



अर्थसंकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीला गतीमान करणारा आहे. देशातील सर्वच घटकांच्या विकासाला गती व गुंतवणुकीला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक उत्तम निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे रोजगार निर्मिती होईल, क्रयशक्ती वाढेल आणि देशाच्या अर्थकारणाला अधिक वेग मिळेल.या अर्थसंकल्पात 'ज्ञान' अर्थात गरीब, युवा, अन्नदाता आणि नारीशक्तीवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. देशातील सर्वात मोठा आर्थिक उत्पन्न गट असलेल्या मध्यमवर्गावरही विशेष लक्ष देण्यात आले आहे. १२ लाख रुपयांपर्यंत करमुक्त उत्पन्न, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाख रुपये, एमएमएमईसाठी क्रेडिट गॅरंटी कव्हर ५ कोटी रुपयांवरून १० कोटी, हे तीन निर्णय मध्यमवर्ग, शेतकरी आणि उद्योजकांना बळ देणारे आहेत. कापूस, तूर व मसूरचे उत्पादन वाढवणे आणि डाळींच्या उत्पादनात देशाला आत्मनिर्भर करण्याची केंद्रीय अर्थमंत्र्यांची घोषणा स्वागतार्ह आहे. 'इंडियन पोस्ट'ला एका मोठ्या सार्वजनिक लॉजिस्टिक संस्थेत रुपांतरीत करण्याच्या निर्णयाने देशातील या जुन्या व महत्वपूर्ण यंत्रणेला नवसंजीवनी मिळेल.

### देशाला आर्थिक महासत्तेच्या दिशेने नेणारा अर्थसंकल्प : आ. चिखलीकर

**नांदेड**- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या पर्वातील केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा



पहिला अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांपासून ते नोकरदारांपर्यंत प्रत्येकाला दिलासा देणारा हा अर्थसंकल्प ठरणार आहे . १२ लाख रुपये पर्यंत आयकरात सुट देणारा हा महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्प म्हणजे देशाच्या नवनिर्माणाची पायाभरणी आहे . आगामी काळात देशातील सर्वच घटकाचा सर्वांगीण आणि पायाभूत विकास करण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. निश्चितच या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाटेला भरपूर असे मिळाले आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला ही नवी गती मिळेल अशी प्रतिक्रिया लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली.

### अपेक्षाभंग करणारा अर्थसंकल्प : खासदार रवींद्र चव्हाण

**नांदेड**- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला काहीच मिळाले नाही. एवढेच नव्हे तर अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राचे नावही घेतले नाही. दुसरीकडे



मात्र निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बिहारसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, जीएसटी, प्रलंबित रेल्वे विषयक प्रश्न आदी विषयावर अर्थमंत्र्यांनी कुठलेच भाष्य केलेले दिसले नाही. त्यामुळे सर्वसामान्यांच्या अपेक्षा भंग करणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी दिली.

# पालकमंत्री सावे यांच्या उपस्थितीत पार पडला संविधान महोत्सव

## भाजपा जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ फेब्रुवारी**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांच्या पुढाकारातून शहरातील श्रावस्ती नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या संविधान महोत्सवाला उदंड प्रतिसाद मिळाला. खऱ्या अर्थाने लोकशाहीची आणि भारतीय संविधानाची अंमलबजावणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार करत असल्याचे मत पालकमंत्री अतुल सावे यांनी यावेळी व्यक्त केले .

श्रावस्ती नगरीत पार पडलेल्या संविधान महोत्सवाला पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण , खा.डॉ. अजित गोपछडे , भाजपाचे



महानगर कार्यकारी अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजुरकर , देविदास राठोड, चैतन्य बापू देशमुख , प्रवीण साले , डॉ. सचिन उमरेकर , उमेश चव्हाण , विजय येवनकर , माजी महापौर मोहिनी यवनकर , किशोर स्वामी , दुष्यंत सोनाळे , राजू यन्नम , कैलास सावते , भी ना गायकवाड , लीना गायकवाड ,लक्ष्मी वाघमारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

संविधान महोत्सवात सहभागी झालेल्या हजारो संविधान प्रेमी समोर बोलताना पालकमंत्री अतुल सावे म्हणाले की ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन देशावर महान उपकार केले आहेत . बाबासाहेबांचे हे ऋण फेडण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने देशातील सर्वच घटकांचा समतोल विकास साधण्याच्या अनुषंगाने प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. त्यामुळेच आज भारताची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा उजळ झालेली आहे. शासकीय योजनांमधील भ्रष्टाचार बंद झाला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ थेट मिळतो आहे. भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नपूर्तीसाठी भाजपा सरकार आणि राज्यातील महायुती सरकार दमदारपणे काम करेल असा विश्वासही पालकमंत्री सावे यांनी व्यक्त केला . यावेळी संविधान महोत्सवाचे प्रास्ताविक संयोजक साहेबराव गायकवाड यांनी केले . माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे यांची समायोचीत भाषणे झाली.

# लोह्यात आजपासून एलपीएल क्रिकेट सामन्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०१ फेब्रुवारी**

मागील पंधरा वर्षापासून लोहा शहर परिसरातील क्रिकेट खेळाडूंना त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, हरहुन्नरी आणि उत्कृष्ठ खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने आयोजकांडून लोहा प्रीमियर लीग नावाने दि. २ फेब्रुवारी पासून क्रिकेटच्या खुल्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

लोहा शहरात बहुतांश क्रिकेट खेळाडू आहेत. मात्र त्यांच्या खेळाचे प्रदर्शन वरिष्ठ पातळीवर जात नाही. त्यातून वरिष्ठ पातळीवर खेळाडू जावेत यासाठी गत पंधरा वर्षांपासून एल पी एल अर्थात लोहा प्रीमियर लीग नावाने क्रिकेटचे सामने आयोजीत केले जातात. यावर्षी दि. २ फेब्रुवारी पासून खुल्या एल पी एल क्रिकेट सामन्यास प्रारंभ होणार असून सदरील सामन्याचे उद्घाटन नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते होणार आहे. सदर स्पर्धेत लोहा लॉयन (द प्राइड), मुंबई इंडियन्स (आरसीबी), टायगर एलेव्हांस, लोहा वॉरियर्स, (आयएसजी) ड्रीम इलेव्हन आदी टीम सहभागी झाल्या आहेत. यसदरील क्रिकेटचे सामन्यांचा आनंद प्रेक्षकांनी घ्यावा असे आवाहन माजी उपनगराध्यक्ष सोनू संगे वार, अनिल धुतमल, विजय चव्हाण, गजानन चव्हाण, अविनाश पवार आणि नियोजन समितीकडून करण्यात आले आहे.

# शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रभावी ठरू शकतो : डॉ. तुषार जाधव

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०१ फेब्रुवारी**

पारंपारिक शेती व्यवसायात पिक पद्धती बदल व तंत्रज्ञानाचा वापर करावा, यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी ठरू शकतो असे बारामती कृषी विज्ञान केंद्रातील तज्ञ डॉ. तुषार जाधव यांनी सगरोळी (ता.बिलोली) येथील कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजित तीन दिवसीय तंत्रज्ञान महोत्सवाच्या शुक्रवार (दि.३१) रोजी समारोपाप्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

रीश ॲग्रो प्रा.ली. चे रविराज साबळे यांनी, पारंपारिक पिकासोबातच फळबाग लागवड केल्यास शेतकऱ्यांना शाश्वत आर्थिक उत्पन्न मिळेल. फळबाग लागवडीचे योग्य नियोजन करून तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा. सुरुवातीपासून तंत्रज्ञानाच्या आधारे पाण्याचे योग्य नियोजन, बाजारपेठेचा अभ्यास करावा. सध्या सर्वच फळाच्या मागणी व पुरवठा यामध्ये मोठी तफावत असून शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन व्यावसायिक दृष्टीकोनातून विचार करावा व योग्य नियोजन करावे असेही ते म्हणाले. नाशिक येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे सचिन वाळूज यांनी गत शेतीचे महत्व सांगून भाजीपाला लागवड फायदेशीर ठरू शकते असे सांगितले. या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनील देशमुख तर पशु संवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीण घुले, उपविभागीय पोलीस अधिकारी रफिक शेख, पोलीस निरीक्षक अतुल भोसले, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. माधुरी रेवणवार आदींची उपस्थिती होती. तीन दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सव यशस्वीतेसाठी संस्कृति संवर्धन मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्रातर्फे सहभागी शेतकरी, विविध कंपन्यांचे स्टॉलधारक, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, प्रायोजक व सहभागी महिलांचे विशेष आभार मानले.

# आमदार चिखलीकर यांच्या उपस्थितीत आज ध्वजपूजन व कथा मंडप भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०१ फेब्रुवारी**

मराठवाड्यातील सुप्रसिद्ध श्री संत नामदेव महाराज मठसंस्थान (धाकटे पंढरपूर ) उमरज ता. कंधार येथे कलशारोहण सोहळ्या निमित्त दि. २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ १०८ कुंडी विष्णू यागयज्ञ या कार्यक्रमाचे ध्वजपूजन, ध्वजारोहण व कथा मंडप भूमीपूजन आज दि.२ फेब्रुवारी रोजी आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या सह साधुसंत महंत यांच्या उपस्थितीत मठाधीपती एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या शुभहस्ते श्रीक्षेत्र उमरज येथे संपन्न होणार आहे.

मराठवाडा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत नामदेव महाराज संस्थान श्रीक्षेत्र उमराज ता.कंधार येथे श्री संत



नामदेव महाराज मंदिर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त दि २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान आंतरराष्ट्रीय भागवत कथाकार श्री देवकीनंदनजी ठाकूर श्रीक्षेत्र वृंदावन धाम यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा होणार आहे. दि. ४ फेब्रुवारी रोजी जगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांच्याहस्ते कलशारोहनाचा मुख्य सोहळा होणार आहे. तसेच या सप्ताह दरम्यान १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ संपन्न होणार आहे.

या कथा स्थानाचे व यज्ञ स्थानाचे धर्मध्वज पूजन, कथा मंडप भूमिपूजन श्री क्षेत्र उमरज संस्थांचे मठाधिपती श्री संत एकनाथ गुरु नामदेव महाराज व नराशम महाराज येवतीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाच्या आढावा बैठकीसाठी आमदार प्रताप पाटील चिखलीकर,आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मुख्य कार्यकारीधिकारी मिनल करनवाल, प्रशिक्षणार्थी आय.ए.एस. अनुष्का शर्मा, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार रामेश्वर गोरे आदी दि.२ फेब्रुवारी रोजी दुपारी उमरज येथे येणार असून या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मठाधिपती श्री संत एकनाथ गुरु नामदेव महाराज यांनी केले आहे.

# खा. अशोक चव्हाण यांची शरद पाटील पवार यांच्या निवासस्थानी भेट



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०१ फेब्रुवारी**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांची माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन आगामी स्वराज्य संस्थेच्या निवडणूकी संदर्भात चर्चा केली.

भारतीय जनता पक्षाचे नेते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांचा कंधार येथे धोंडगे प्रवेश मेळाव्याला जात असताना लोहा येथील शिवाजी चौकात चंद्रशेन पाटील सुरनर आंडगेकर यांच्या भाजप संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करुन केले. कंधार येथील प्रवेश मेळाव्यला मार्गदर्शन करुन बेरळी (खु) येथे ढेंबरे कुटुंबीयाची सांत्वन भेट घेऊन भाजपाचे कार्यकर्ते माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली या भेटीमध्ये आगामी स्वराज्य संस्थेच्या निवडणूकी संदर्भात सखोल चर्चा केली.भाजपा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी आ.अमर राजुरकर , देविदास राठोड,माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी, केरबा सावकार बिडवई, संतोष पांडागळे, माजी सभापती बालाजी पांडागळे,चंद्रशेन सुरनर, सदाशिव आंबुरे,नागनाथ चुडावकर,माजी नगरसेवक युवराज वाघमारे,नबी शेख, गिरधारी सिध्दीवान, बंडू पाटील,रावसाहेब पाटील इंगोले, मौलाना अकबर, शिवराज पाटील पवार,घनश्याम पाटील पवार, दत्ता शेटे, सतीश आणेराव, गोवर्धन पवार,बाबुभाई शेख,यांच्यासहित मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते उपस्थित उपस्थित होते.

# वाळू चोरीसाठी आणलेले नदिपात्रातील तराफे जाळून नष्ट

## तहसीलदार किशोर यादव यांची आणखी एक धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०१ फेब्रुवारी**

माहूर तालुक्याला वळसा घालून गेलेल्या पैनगंगा नदी पात्रावरील चोलेवाडी या गावाला लागून असलेल्या चोले पेंड या नदी पेंडाला लागून असलेल्या नदीपात्रात वाळू तस्करांनी वाळू चोरी करण्यासाठी नदीपात्रातील पाण्यात दोरीने बांधून ठेवलेले दोन तराफे माहूर तहसीलदारांनी पाण्यातून नदीपात्रावर आणून जागेवरच जाळून भस्म केल्याची अवैध वाळू तस्करी विरोधातील आणखी एक बेधडक कारवाई मंगळवार दिनांक २८जानेवारी रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास पूर्णत्वास नेल्याने वाळू तस्करांच्या मनात माहूर चे तहसीलदार किशोर यादव न्ड महसूल अधिकारी, कर्मचारी पथकाच्या धडक कारवाईची धडकी भरली असल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या आठवड्याभरापासून तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू चोरीसाठी नदीपात्रातून बनविलेले रस्ते खोदण्याचे



काम सुरू केले असून विदर्भातील वाळू तस्कर ही माहूर च्या हद्दीतून पैनगंगा नदी पात्रातून वाळू रात्रीला वाळू चोरी करत असल्याने महागाव आर्णि तहसील हद्दीतील असलेल्या पैनगंगा नदी पात्रावर तहसीलदार किशोर यादव यांनाच नजर ठेवावी लागत असल्याने रात्री कुठेही जावे लागत आहे. मराठवाड्यातील वाळू तस्करांनी संगणमत करून रात्रीला तरफ्याद्वारे वाळू उपसणार असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदारांनी अनेक ठिकाणी लपवून ठेवलेले तराफे जाळले असून नदीपत्रात दोरी च्या साह्याने बांधून नदीच्या वळणावर पाण्यात लपून ठेवलेले तराफे नदीपात्रातील पाण्यात उतरून बाहेर काढत ते जाळून भस्म करत असल्याने वाळू तस्कर बिळात लपून बसले की काय असा भास होत आहे.

अनेक ठिकाणी वाळू तस्करांनी तराफे लपवून ठेवलेले असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदार किशोर यादव यांनी तलाठी एस डी गावंडे महसूल सेवक दीपक लोखंडे वाहन चालक विलास शेडमाके यांचे सह ही तराफे जाळण्याची भस्मासुरी प्रशासकीय कार्यवाही केल्याने विदर्भातील गोळीबार करणारे डॉन बिळात लपले असून तहसीलदारांच्या वेळप्रसंगी गोळी घालण्याचा इशाऱ्यामुळे वाळू तस्करी सध्या तरी बंद असल्याचे दिसून येत आहे.

# भोकर येथे टेनिस बॉलचे क्रिकेट सामने

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०१ फेब्रुवारी**

येथे दि.४ फेब्रूवारी पासून आमदार चषक चे आयोजन करण्यात आले असून या टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उद्घाटन आ.श्रिजया चव्हाण यांचे हस्ते होणार असल्याची माहिती शेख यूसूफ भाई व ॲड.विशाल दंडवे यांनी दिली. खेळाडूंना संधी मिळावी याकरिता आमदार चषक ट्रेनिस बॉल क्रिकेट आमंत्रीत सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे या सामन्याचे प्रथम बक्षीस माजी उपनगराध्यक्ष शेख युसुफभाई यांच्याकडून १,२१,१११ रुपये तर द्वितीय पारितोषिक दिलीप सोनवडे ७७,७७७ तृतीय पारितोषिक बाजार समितीचे संचालक पंकज पोकलवार यांचेकडून ५५ ,५५५ चौथे बक्षीस बंटी राठोड यांचेकडून देण्यात येणार असून तसेच मॅन ऑफ मॅच बेस्ट कॅच बेस्ट फिल्डर बेस्ट बॅट्समन बेस्ट किपर असे विविध बक्षीस ठेवण्यात आले.



आहेत उद्घाटन प्रसंगी अमर भाऊ राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तरी भोकर शहरासह भोकर तालुक्यातील असंख्य क्रीडा प्रेमी या सामन्यांचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन शेख यूसूफ भाई व ॲड.विशाल दंडवे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाज परिवर्तनाचे साधन- यशवंत गोसावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य केवळ मनोरंजन नव्हें, तर समाज परिवर्तनाच साधन होते. अण्णाभाऊ साठे यांनी लेखनीतून वंचित, उपेक्षित समाज घटकांच्या व्यस्था, संघर्ष आणि आकांक्षा प्रभावीपणे मांडल्या आ-हेत. त्यांचे साहित्य म्हणजे कथा, कादंबऱ्या, लोकनाट्ये, कविता आणि पोवाड्यांचा एक अफाट खजिना आहे. त्यांच्या लेखणीतून सम ाजातील विषमता, अन्याय आणि शोषणाचा पर्दाफाश झाला असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते यशवंत गोसावी ने यांनी केले.

हिंगोली शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृहात क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी महासंघ जिला शाखेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उदघाटन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून 'लसाकम' चे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे होते तर प्रमुख अतिथी म्हणून समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, प्रा डॉ भगवान सुर्यवंशी, मनोज आखरे, सेवानिवृत्त शिक्षिका शोभा धुमाळ, रामदास गायकवाड हे होते. व्याख्यानमालेच्या समारोपीय सत्रात 'अण्णाभाऊ साठेंच्या विचारातील परिवर्तनवाद व आजचे वास्तव' या विषया पर व्याख्यान देताना यशवंत गोसावी म्हणाले की अण्णाभाऊ साठे यांचे नाव घेतल्यावर डोळ्यासमोर उभे राहते ते म्हणजे परिवर्तनासाठी झगडणारा साहित्यिक, शोषित आणि वंचितांचा आवाज बनलेला एक सम ाजक्रांतिकारक लेखक. त्यांचे साहित्य हे फक्त शब्दांचे संकलन नाही, तर ते समाजाला बदलासाठी जागवणारे प्रभावी साधन आहे.

अण्णाभाऊ साठे हे दलित साहित्याचे जनक मानले जातात. त्यांच्या साहित्यकृतींमधून त्यांनी वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या व्यथा, संघर्ष आणि आकांक्षा प्रभावीपणे मांडल्या. केवळ दिड दिवस शाळेत जाऊन कोणतेही उच्च शिक्षण न घेणारे अण्णाभाऊ यांनी साहित्यक्षेत्रात मोठी क्रांती केली. अण्णाभाऊच्यां विचारांची दखल रशिया आणि इतर देशानी घेतली. अण्णाभाऊंचे विचार ऐकण्यासाठी त्यांना विदेशात बोलावणे आले. त्यांनी आपल्या पोवाड्यांम धून तर शोषितांच्या व्यथांना आवाज दिला. त्यांच्या पोवाड्यांमध्ये दलितांचे दुःख, अन्यायाविरुद्धचा रोष आणि परिवर्तनासाठीची इच्छा दिसून येते. त्यांनी सांगितले होते की, साहित्य हे समाजाचे आरसे असतात, त्यात सत्य प्रतिबिंबित व्हायला हवे. अण्णाभाऊ साठे यांनी दाखवलेला परिवर्तनाचा मार्ग हा केवळ एक विचारधारा नसून तो प्रत्यक्ष कृतीचा आधार आहे. त्यांच्या साहित्याच्या अभ्यासातून आपण समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण, स्वाभिमान आणि सन्मान यांचा अधिकार मिळवून देऊ शकतो.

अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य ही आजच्या तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे साहित्य आपल्याला शिकवतात की संघर्ष हा बदलाचा पाया आहे आणि विचार हा त्याचा मार्गदर्शक. आपण त्यांच्या लेखणीतून आत्मसात केलेले परिवर्तनवादी विचार आपल्या जीवनात अंमलात आणले, तरच आपण खऱ्या अर्थाने समाजाला बदलण्यास हातभार लावू शकतो. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे आपल्याला जागृत करणारे आणि नव्या दिशा देणारे आहे. त्यांनी दाखवलेला परिवर्तनाचा मार्ग हा आपल्या समाजाला एका उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाईल. त्यांच्या विचारांचे आणि साहित्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोप करताना बालाजी थोटवे म्हणाले की अण्णाभाऊ साठे यांच्या नावानी चालणारी व्याख्यानमाला विचार जागर आहे. अण्णाभाऊ साठे यांचे विचार सम ाजातील प्रत्येक घर-घरात पोहचले पाहिजे. कार्यक्रम ाचे सुत्रसंचालन रामदास कांबळे आणि आभार प्रदर्शन आत्माराम गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लहुजी साळवे कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी यांनी विशेष प्रयत्न केले.

# खरेदी व विक्रेत्यांकडून कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत खरेदीदार व विक्रेता संमेलन कार्यशाळेचे आयोजन अकोला रोडवरील एका हॉटेलमध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन विभागीय नोडल अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये सहा करार करण्यात आले.

स्मार्ट प्रकल्पाचा उद्देशाबाबत भास्कर कोळेकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पुरवठा मूल्यसाखळी तज्ञ जी. एच कच्छवे यांनी उपस्थित खरेदीदार यांना संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर सर्व यंत्रणा प्रमुख तसेच दत्तगुरु शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक गंगाधर श्रृंगारे, कयाधू शेतकरी उत्पादक कंपनीचे महेंद्र माने, श्री फाळेश्वर महाराज शेतकरी उत्पादक कंपनीचे मारोती वैद्य यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नोडल अधिकारी जी. बी. बंटेवाड यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ओमप्रकाश गलांडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व्ही. बी. जगताप, व्हीएसटीएफ यंत्रणेचे प्रतिनिधी, पशुसंवर्धन विभागाचे प्रतिनिधी तसेच जिल्ह्यातील सर्व यंत्रणेचे स्मार्ट प्रकल्प अंतर्गत मंजुरी प्राप्त असलेले एकूण २४ कंपनीचे संचालक, एडीएम लातूरचे प्रतिनिधी हनुमंत चामवाड, गंगाधर शृंगारे, भव्या इंटरप्रायसेस, विठ्ठल दालमिल, पुरुष-ोत्तम बाहेती, फार्म को अग्रो प्रोडक्ट संचालक विष्णू कायंदे, पांडुरंग माऊली शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक जगन्नाथ गादेकर, रिधान ग्रो फूड पार्कचे संचालक स्वप्नील लोने, आदित्य ट्रेडिंग कंपनी संचालक विशाल काबरा आदी खरेदीदार, विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, जिल्हा अंम लबजावणी कक्षातील कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# तोष्णीवाल महाविद्यालयात राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव महाविद्यालयात संत नामदेव सभागृहात कै. अयोध्याबाई रामनारायण तोष्णीवाल राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे सलग आठव्या वर्षी आयोजन करण्यात आले ज्यामध्ये राज्यभरातून एकुण १८ संघानी सहभाग नोंदविला. स्पर्धकांनी एक देश एक निवडणूक योग्य /अयोग्य या विषयावर अभ्यासपुर्ण व मुद्देनिहाय चर्चा केली. यावेळी विजयी संघांना मान्यवरांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात कै. अयोध्याबाई तोष्णीवाल यांच्या प्रतिमेचे पुजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शेळके सचिव, तर उद्घाटक कैलासराव देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. ए. जोशी, डॉ. एस.आर. पजई तसेच सदरील स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे, डॉ. रमेश कुरे, डॉ. सोनकांबळे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. आर. पजई यांनी केले. अध्यक्षीय सामारोपातून यु. एम. शेळके यांनी वाद विवाद स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा कसा सर्वांगीण विकास होतो. यातून एखादया गोष्टीची स्वच्छ प्रतिमा सर्वासमोर येते. म्हणून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.टी.यु. केंद्रे यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. घन पी. के. यांनी व्यक्त केले. यावेळी विजयी महाविद्यालयांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.



**हिंगोली- श्री गणेश जयंतीनिमित्त शहरातील नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीसमोर महापूजा, होम हवन तसेच महाआरती करण्यात आली. यावेळी शहरातील सुप्रसिध्द डॉ यशवंत पवार यांनी सपत्नीक महापूजा, महाआरती केली. सकाळपासूनच चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी रांगा लावल्या होत्या. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. छाया- सुनील पाठक**

# शांताबाई दराडे विद्यालयाचे भूगोल प्रज्ञा शोध परिक्षेत घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा २०२४ मध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे. हि परीक्षा भूगोल प्रज्ञाशोध केंद्र, नवी मुंबई द्वारे आयोजित केली जाते. यामध्ये पूजा केशव वाढवे या इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनीने सुवर्णपदक पटकावले आहे. तर प्रणिता पुरभा घोडके वर्ग दहावा व हनुमान गजानन जाधव वर्ग आठवा हे दोघे रौप्य पदकाचे मानकरी ठरले आहेत. तसेच इयत्ता आठवीचा शुभम विजय पडोळे या विद्यार्थ्याने ब्रांझ पदक मिळवून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. तसेच कु. धनश्री संजय गुट्ठे, ऋद्वीका घुगे, दिशा खिल्लारे, मोक्षदा माने, कृष्णा पडोळे, सारिका जाधव व सम्यक कांबळे या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर पारितोषिक प्राप्त झाले आहे.

या विद्यार्थ्यांना उपक्रम शील भूगोल अध्यापक संजय रुस्तुमराव गुट्ठे व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती आर एन पा-चरणे यांनी मार्गदर्शन केले. याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचे शाळेचे व संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसी चिलमूल यांनी सत्कार केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक अध्यापकांचे अभिनंदन केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# सारंगवाडीतील ग्रामसभेत सरपंचाविरोधात मतदान, अविश्वास ठरावाच्या बाजूने ४२२ मतदान



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १ फेब्रुवारी**

औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी, गवलेवाडी येथील सरपंच प्रभुलिंग काशिनाथ शिवाचार्य महाराज यांच्या विरोधात येथील नऊ ग्रामपंचायत सदस्यांनी दाखल केलेल्या अविश्वास प्रस्ताव २० जानेवारी रोजी विशेष ग्रामपंचायतच्या सभेत नऊ विरुद्ध एक या मताने सरपंचाच्या विरोधात पारित झाला होता. तो प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता त्यानुसार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी परत जनतेतून विशेष ग्रामसभा घेऊन ३१ जानेव-ारी रोजी या ठरावावर गुप्त मतदान घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दिनांक ३१ जानेवारी रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेमध्ये मतदारांना मतदानासाठी नोंदणी करण्यासाठी सांगण्यात आले होते ग्रामसभेत मतदारांनी नोंदणी केली व त्यानंतर प्रत्यक्ष मतदान झाले त्यामध्ये एकूण ४९९ मतदान झाले त्यापैकी अविश्वास ठरावाच्या बाजूने ४२२ मतदान झाले अविश्वास ठरावाच्या विरोधात ५१ मतदान झाले तर २६ मतदान बाद झाले. त्यामुळे हा अविश्वास प्रस्ताव जनतेतून सुद्धा मतदानाच्या स्वरूपात प्रभूलिंग काशिनाथ शिवाराचार्य महाराज यांच्या विरोधात प्रचंड बहुमताने मंजूर झाला ठराव मंजूर झाल्यानंतर गावकऱ्या तर्फे जल्लोष करण्यात आला.

या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून सहाय्यक गटविकास अधिकारी बी.आर.गोरे यांनी काम पाहिले तसेच विस्तार अधिकारी सय्यद जमीर, एस. एम. आमले, राजकुमार बर्वे, मोहम्मद कलीम, ग्रामविकास अधिकारी गंगाधर हलबुर्गे, कैलास देशमुख, के.जी. काळे, आर.एम. चौधरी, मुंजाजी काळे, मंडळ अधिकारी रंगनाथ मेहत्रे, तलाठी ज्योती स्वामी, गोपाल मुकीर, निवडणूक विभागातील नितीश कुलकर्णी, उमाकांत मुळे व येथील शिक्षक रुस्तम बोंगाणे यांनी या कामासाठी सहकार्य केले. यावेळेस शिरड पोलीस चौकीचे फौजदार श्रीधर वाघमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# हिंगोलीत हॅकथॉन प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

आर के किड्स कॅम्प स्कूल येथे हिंगोली जिल्ह्याचे हॅकेथॉन प्रदर्शन संपन्न झाले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उपशिक्षणाधिकारी नितीन नेटके, रवी कवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच परीक्षक म्हणून अधिव्याख्याता राजाराम टकले (डाएट अंबेजोगाई),अधिव्याख्याता प्रकाश शिरसे (नांदेड), शीतल शिंदे, चंद्रकांत धुमाळे, बजरंग बोडखे हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी नांदे व गिरी, शिक्षण विस्तार अधिकारी आसोले, केंद्रप्रमुख शिंदे, जिरवणकर, मुख्याध्यापक संजय मेथेकर, मुख्याध्यापिका सौ.सविता येवले, साधनव्यक्ती गुंडारे, पत्तेवार, पत्रे, रसाळ आदींनी परिश्रम घेतले. यामध्ये अनेक शाळांनी सहभाग घेतला.

# कळमनुरी तालुकाध्यक्षपदी अवधूत नीळकंठे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

(शरदचंद्र पवार )पक्षाचे आवधुत निळकंठे यांची निवड कळमनुरी तालुक्यातील सोडेगाव येथील रहिवासी असणारे अवघुत निळकंठे यांची निवड प्रदेशध्यक्ष जयंत पाटील व जयप्रकाश दांडेगावकर याच्या आदेशा नुसार जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी केली. यावेळी अनिल पतंगे, डॉ संतोष बोंढारे, बाबुराव वानखेडे, डॉ वसंतराव पंतगे, अभिजित देशमुख, आबु बोरकर, सचिन चव्हाण, डॉ गणेशराव निळकंठे गणेश काळे, मंचक निळकंठे राजेश निळकंठे, शिवाजी पंतगे कडोजी दांडेगावकर, राऊजी बेलेसह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महसूल कर्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



हिंगोली जिल्हा महसूल सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन आज येथील कै.शिवाजीराव देशमुख सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. या कार्यक्रमास रसिकांचा उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, तहसीलदार सर्वश्री. श्रीकांत भुजबळ, जीवककुमार कांबळे, हरीश गाडे, सखाराम मांडवगडे, शारदा दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपली कला सादर केली. याप्रसंगी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी एक प्यार का नगमा है हे गीत गात उपस्थित रसिकांचा वन्समोर मिळवला.

या सांस्कृतिक स्पर्धेत समूह गायन प्रकारात कळमनुरीचा स्मिता सुर्यवंशी व इतर संघ प्रथम, एकपात्री कला प्रकारात वसमतच्या माधव वाडीकर यांना प्रथम, वैयक्तिक गीत गायनामध्ये विनोद डोणगावकर व नकुल वाघुंडे प्रथम, आम्रपाली चोरमारे द्वितीय, स्मिता सुर्यवंशी यांना तृतीय क्रमांक मिळाला आहे. समुह नृत्यामध्ये सुधाकर सराटे व संघ प्रथम, माधव वाडीकर व त्यांचा संघ द्वितीय आला आहे. युगल गीत गायनामध्ये प्रल्हाद गोटे व आम्रपाली चौरमारे यांना प्रथम क्रमांक, मृदंग वादन मध्ये दत्ता वालेकर यांना प्रथम क्रमांक, युगल नृत्यामध्ये किरण पाव-डे व दिपाली संघई यांना प्रथम क्रमांक, अभंगामध्ये शिल्पा सरकटे यांना प्रथम क्रमांक, नाटिकेमध्ये शिरीष आसेगावकर प्रथम, वैयक्तीक नृत्यामध्ये मारोती सिरसाट व शंभू दुभळकर यांना प्रथम, हार्मोनियम वादनामध्ये संदीप डोंगरे यांना प्रथम तर लावणीमध्ये व्यंकटी मनुरकर यांना प्रथम क्रमांक मिळाला आहे. या सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच या सर्व विजेत्यांना विभागीय स्तरावर जालना येथे दि. १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी परीक्षक म्हणून शिल्पा नरसीकर व मंगेश पांडे यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसचांलन अशोक केंद्रेकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, संजय घुगे, आक्रम शेख यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जमीन अधिग्रहणाच्या नावाखाली ९०० कोटींचा भूखंड घोटाळा

## संबंधितांची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागा कडून चौकशी करून रक्कम वसूल करून गुन्हे दाखल करा –मा.आ.संतोष सांबरे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

जालना शहरात खरपुडी येथे सिडको प्रकल्पाच्या उभारणी करिता काही भू माफियांनी संगनमत करून व्यवहार्य नसतांना हि डी नोटीफाईड (रद्द ) झालेला प्रकल्प अधिकारी व अहवाल तयार करणाऱ्या खाजगी कंपनीशी आर्थिक संगनमत करून अत्यंत चुकीचा व बोगस आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करून घेऊन सिडको ची दिशाभूल केलेली आहे व जमीन अधिग्रहणाच्या नावाखाली धनदांडग्या उद्योजक भूमाफिया यांनी एकत्रित खरेदी केलेल्या जमिनी येलो करून सिडको प्रकल्पाच्या नावाखाली जवळपास ९०० कोटींचा जमीन घोटाळा केलेला आहे ,



सिडको ने सुरुवातीला नेमलेल्या अन्स्र्ट अँड यंग कंपनीने जालन्यातील खरपुडी येथील सिडको प्रकल्प पाण्याची उपलब्धता नसणे , जमिनीचे दर , लोकांची क्रय शक्ती , अधिग्रहणाला लागणार अवाढव्य खर्च , कमी किमतीत शहरात उपलब्ध जमिनी , कनेटिव्हिटी इ कारणांमुळे खरपुडी सिडको प्रकल्प शासनाला परवडणारा व व्यवहार्य नसल्याचा सुस्पष्ट अहवाल सिडको प्रशासन व शासनाला सादर केल्या नंतर सिडको च्या सर्व साधारण सभेत बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी सर्वानुमते सदर प्रकल्प डी नोटीफाईड (रद्द ) करण्या बाबतचा ठराव शासनाकडे पाठवला होता व शासनाने खरपुडी सिडको प्रकल्प रद्द केला होता

त्या नंतर आर्थिक संगनमत करून व अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून घझचऋ या कंपनी कडून आर्थिक गैरव्यवहार करून खोटा , बनावट व बोगस आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करून सिडको व शासनाची दिशाभूल करून रद्द झालेला व व्यवहार्य नसलेला प्रक्लप नियमबाह्य पद्धतीने परत एकदा नोटीफाईड (मंजूर ) करून घेतला , भूमाफियांनी येलो जमिनीचे कोट्यवधी रुपये एकरी मिळत असून शेतकऱ्यांना ग्रीन जमिनीचा कवडीमोल मावेजा मिळत आहे . व्यवहार्य नसलेली शेकडो एकर जमीन सिडको च्या व शासनाच्या माथी मारून ९०० कोटींचा जमीन घोटाळा भू माफियांनी केलेला असून या संपूर्ण प्रकरणाची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग कडून सखोल चौकशी करावी व संबंधितांकडून मावेजा रक्कम व्याजासह वसूल करून गुन्हे दाखल करावे या मागणी साठी पुराव्यासह मंगळवारी माजी आमदार संतोष सांबरे मा मुख्यमंत्री , मा उप मुख्यमंत्री यांची भेट घेऊन मागणी करणार आहे .

## संक्षिप्त

### व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्षपदी सुयोग खर्डेकर यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्षपदी सुयोग खर्डेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. येथील हॉटेल मधुबन मध्ये दि. ३० जानेवारी २०२५ रोजी बैठक पार पडली. या बैठकीस प्रामुख्याने महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी, दैनिक विंगचे जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव, सचिव रविकांत दानम, लियाकत अली खान उपस्थिती होती. तर व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांची ऑन लाईन उपस्थिती होती.

व्हाईस ऑफ मिडीया ही पत्रकारांची संघटना असून ती जवळपास चाळीस देशात कार्यरत असून भारताची सर्वात मोठी संघटना आहे. या संघटनेचे संपूर्ण भारतात जवळपास तीन लाख सभासद आहेत. आणि या संघटनेचे वेगवेगळे २१ विंग आहेत. यात दैनिकांसाठी वेगळी, साप्ताहिकांसाठी वेगळी, तर उर्दू दैनिक आणि साप्ताहिकांसाठी वेगळी विंग आहे.

महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीत प्रारंभीच सुयोग खर्डेकर यांच्या नावाची चर्चा करण्यात आली आणि तेच या पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आल्यानंतर जिल्हाध्यक्ष म्हणून सुयोग खर्डेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यावेळी देवचंद सावरे, युवराज कुरिल, कहैय्या रामरख्या मितवा, मुकेश परमार, शिवाजी बावणे, बासीत बेग, नटवर किल्लेदार, कादरी हुसेन, सय्यद अफसर, शब्बीर पठाण, सचिन सर्वे आदींची उपस्थिती होती. या बैठकीचे सुत्रसंचालन गोपाल गोमंतीवाले यांनी केले.



परतुर येथील माजी नगरसेवक शरीफ कुरेशी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. त्यावेळी त्यांचे स्वागत करताना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले. यावेळी अर्शद बागवान, सलीम बागवान, सोमनाथ चौधरी आदी.

### प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रासाठी ७ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जालना तालुक्यातील सेवली, देवमुर्ती आणि मंठा तालुक्यातील तळणी तसेच भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे कौशल्य विकास केंद्र स्थापन करावयाची आहेत. तरी जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण भागीदार नियुक्त करण्यासाठी संस्थांनी जालना येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात र्हीींिं://ींळपूीश्र.ले/३ऱ्रींह्यु या लिंकवरून प्रस्ताव डाऊनलोड करून शुक्रवार दि.७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले आहे.

## भोकरदन नगर परिषदेची अतिक्रमण हटवण्याची कार्यवाही एकतर्फी; आम आदमी पार्टी करणार आंदोलन –बोरसे गुरुजी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

नगर परिषदेमार्फत राबवण्यात आलेल्या अतिक्रमण हटवीण्याच्या आणि वसुली बाबतच्या कार्यवाहीचे अभिनंदन! परंतु संबंधित कार्यवाहि मध्ये दुजाभाव झाला असून गरिबावर अन्याय करणारी धन दांडग्यांना व पुढाऱ्यांना अभय देणारी कार्यवाही ठरली आहे असा आरोप आम आदमी पार्टीचे जिल्हा अध्यक्ष कडूबा बोरसे यांनी केला आहे . या बाबत आम आदमी पार्टी मार्फत मा.उपविभागीय अधिकारी व नगरपालिकेचे सिओ यांना निवेदन देण्यात आले आहे,यांना या निवेदनात नमूद केले आहे की भोकरदन शहरात रहदारीला अडचण निर्माण होत असली तरी . अनेक लोकांनी बेकायदेशीर अतिक्रमण करून नगरपरिषदेच्या जागा ओपन स्पेस हडपण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे नगरपरिषदे मार्फत राबवलेली अतिक्रमण हटवण्याची मोहीम आणि वसुली मोहिम अतिशय अभिनंदनिय असून आम आदमी पार्टी तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे. परंतु असे की संबंधित कार्यवाही फक्त



गरीब लोकांच्या बाबतच राबवण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. शहरातील श्रीमंत लोक तसेच वेगवेगळ्या पक्षांच्या पुढार्यांनी नगरपरिषदेच्या सरकारी जागेवर अतिक्रमण केलेले आहे.पुढार्यांकडे लाखो रुपयांची थकबाकी इमारत भाड्याच्या रूपामध्ये व इतर कराच्या रूपामध्ये आहे. त्याबाबत आपली भूमिका दुजाभाव करणारी असल्याचे जनमानसात बोलल्या जात असल्याचा आरोप देखील त्यांनी यावेळी करण्यात आला , राजकीय व्यक्ती कितीही मोठा असला तरीही त्यांनी नगरपरिषदेच्या व सरकारी जागेवर केलेले अतिक्रमण हटवण्यात यावे.तसेच त्यांच्याकडे अस–लेली नगरपरिषदेची थकबाकी वसूल करण्यात यावी. घाटी रुग्णालयापासून पासून भन्साळी यांच्या दुकानापर्यंतचा पाननंद रस्त्यावर, तसेच टिपू सुलतान चौकापासून अमर हॉस्पिटल पर्यंतच्या नाल्यावरील अतिक्रमण आणि नगरपरिषदेची परव–ानगी नसताना बांधलेल्या इमारती याबाबत आपली भूमिका स्पष्ट झालेली नाही. त्या अतीक्रमन धारकांना आपण वाचवित आहात का ? सध्या सुरू असलेला दुजाभाव झाल्याचा आरोप त्यांनी नमूद केला आहे, महाराष्ट्र शासनाच्या तो निदर्शनास आणून देण्यात येईल. धनदांडग्या पुढाऱ्यांना सूट देऊन फक्त सर्वसामान्यावर व गरिबांवर होणाऱ्या कार्यवाहि बाबत आम आदमी पार्टी मार्फत नगर–परीषद कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे . तसेच याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.असा इशारा देण्यात आलेला आहे. या निवेदनावर महजाद खान, सोळंके पाटील, फारुक भाई यांच्या स्वाक्षऱ्या आहे ,

## सहशिक्षक बबनराव दवंड यांचा सपत्नीक सेवागौरव



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

आज लाल बहादुर शास्त्री हायस्कुल,उस्वद ता.मंठा येथील सहशिक्षक श्री.बबनराव दवंड सर हे सेवानिवृत्त झाल्याने संस्थेचे सचिव तथा युवक जिल्हाध्यक्ष कपिल भैय्या आकात यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सेवागौरव करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाला श्री.वसंतराव राऊत,मुख्याध्यापक श्री.आसाराम खरात सर,केशव चोरमारे,सत्यभान सरोदे,सूदाम आकात तसेच दवंड सरांचे नातेवाईक,शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची थकीत कर्ज प्रकरणासाठी सवलत योजना

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एक रक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एक रक्कमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी सदर योजनेचा फायदा घेवून कर्ज मुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित यांचे जिल्हा कार्यालय, जालना यांच्या विविध कर्ज योजनेअंर्तगत जालना जिल्ह्यातील इतर मागास प्रर्वगातील लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने कर्ज वितरीत केले आहे. जिल्हा कार्यालयाकडून वाटप झालेल्या थकीत लाभार्थींनी महामंडळाकडून थकीत व्याज दरात ५० टक्के सवलत दि.३१ मार्च २०२५ पर्यंत देण्यात येणार आहे. या एक रक्कमी परतावा योजनेचा लाभ घेवुन सर्व संबधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कमेचा भरणा करुन कर्ज खाते बंद करण्यासाठी जिल्हा कार्यालय, जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे भेट द्यावी अथवा दुरध्वनी क्र. ०२४८२–२२३४२० यावर संपर्क साधावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## गावठी पिस्तूलातून गोळीबार करत एकास ९५ हजाराला लुटले



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लूटमार करतांना झालेल्या झटापटीनंतर एका युवकावर दरोडेखोरांनी गावठी पिस्तूलातून गोळीबार करीत, ९५ हजाराला लुटल्याची घटना छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नागेवाडीजवळ गुरुवारी रात्री १०.१५ वाजेच्या सुमारास घडली आहे.

चंदनझिरा भागातील स्क्रॅपचा व्यापारी शेख इम्रान शेख एजाज (वय १७) हा युवक काल त्याची चारचाकी ब्रेझा कार दुरुस्तीसाठी २ लाख रुपयांची रक्कम घेऊन संभाजीनगर येथे गेला होता.कार दुरुस्ती करून व दुरुस्तीचे १ लाख ५ हजाराचे बिल जमा करून रात्री तो जालन्याकडे निघाला होता. त्याने त्याची ब्रेझा कार नागेवाडी शिवारात असलेल्या स्क्रॅपच्या गोदामात उभी करून, तेथून मोटारसायकलने घरी चंदनझिरा येथे तो निघाला होता. त्याची मोटारसायकल नागेवाडीजवळ असलेल्या आई अमृततुल्य चहाच्या हॉटेलजवळ येताच तोंडाला काळे रुमाल बांधलेल्या तीन दरोडेखोरांनी अडवली.यावेळी दरोडेखोरांनी इम्रान यास धक्काबुक्की व मारहाण करीत पैसे काढून देण्यास सांगितले, मात्र त्याने प्रतिकार करीत नकार दिल्याने त्याच्यात आणि दरोडेखोरांमध्ये जोरदार झटापट झाली.त्याचवेळी त्यातील एका दरोडेखोराने गावठी पिस्तूलातून एक गोळी इम्रान याच्या दिशेने झाडली. त्यांनतर तो खाली पडल्यानंतर त्याच्याजवळ असलेले ९५ हजार रुपये हिसकावून घेऊन दरोडेखोर शेतातून पळून गेले. इम्रान याच्या छातीच्या उजव्या बाजूला गोळी लागली असून, नातेवाईकांनी रात्रीच त्याला संभाजीनगर येथील सिग्मा हॉस्पिटलमध्ये हलविले आहे.दरम्यान, जखमीच्या छातीत गोळी अडकलेली असून, शस्त्रक्रिया करून गोळी बाहेर काढावी लागणार असल्याचे समजते.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एम. बी. स्कॉट, सहायक फौजदार सय्यद यांनी आज दि.३१ शुक्रवार रोजी संभाजीनगर येथे जाऊन जखमी युवकाचा जवाब नोंदवला आहे. सायं. पाच वा. पर्यंत चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला नव्हता.

## जालन्यात मालमत्ता कर न भरणाऱ्यावर जालना महानगरपालिकेने केली थेट जप्तीची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील कर न भरणाऱ्या लोकांवर महानगरपालिकेची टांगती तलवार असून थकबाकी न भरणाऱ्याना थेट कारवाईला सामोरे जावं लागतंय...आज दि.३० गुरुवार रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास जालन्यात मालमत्ता कर न भरणाऱ्यावर जालना महानगरपालिकेने थेट जप्तीची कारवाई केलीय...मंठा



रोडवर डी.मार्ट जवळ असलेल्या अबड यांच्या मालकीचे सिमेंटच्या गोडाऊनची स्थावर आणि जंगम मालमता आज जप्त केलीय.. २०१८ पासून २०२५ पर्यंतची थकीत कर ५ लाख ९८ हजार रुपये असून महानगरपालिकेने त्यांना वेळोव–ेळी नोटीसा बजावल्या... तरीही दाद न दिल्याने नाईलाजाने अखेर ही कारवाई करावी लागलीय. सदरील कारवाई महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर आणि अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त अपर्णा जाधव यांच्यासह टीममधील कर अधिकारी राजेश कुरलिये, कर निरीक्षक बी सी राठौड, लक्ष्मीकांत नाकाडे, वसुली लिपिक विकास जैस्वाल आणि पथकातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

### आमदार बबनराव लोणीकर यांनी मंजूर केलेल्या सभामंडपाचे राहुल लोणीकर यांच्या शुभहस्ते लोकार्पण

## धर्माच्या कामासाठी आम्ही सदैव तत्पर –राहुल लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

धर्मकार्यासाठी, आपल्या वडिलांनी दिलेला कानमंत्र हा खऱ्या अर्थाने महत्त्वाचा असून, आमदार बबनराव लोणीकर साहेबांच्या माध्यमातून आपण मतदार संघामध्ये, सदैव धार्मिक सांस्कृतिक सामाजिक कार्यामध्ये सर्वजण हिताय हा विचार पुढे घेऊन जाणार असल्याचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले ते येनोरा येथे संत नामदेव बाबा समाधी मंदिराचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी

भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर व ह भ प बाळू महाराज गिरगावकर यांच्या उप–स्थितीमध्ये संपन्न झाला.

यावेळी पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की , माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी देव देश आणि धर्मासाठी सदैव स्वतःला झोकून देऊन काम केलेलं असून त्यांच्या प्रेरणेतून मी नियमितपणे जिथे कुठे सत्कर्म असेल धर्मकार्य असेल तिथे आवर्जून उपस्थिती लावत त्या



ठिकाणच्या समस्या जाणून घेणारा भावनाशील व्यक्ती असून वडिलांनी दिलेली शिकवण कधी विसरणार नसून , समाजातील दिन दलित पीडित धर्मपरायण सर्वसामान्य जनतेसाठी काम करत असून यापुढेही करत राहणार असल्याचे सांगितले पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, नितीन जोगदंड हा माझा बालमित्र असून, खऱ्या अर्थाने समाज सेवेसाठी वाहून घेणारा कार्यकर्ता आहे त्यामुळे आपण नितीन जोगदंड आणि त्यांच्या सगळ्या टीमचे अभिनंदन करत असून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून येनोरा आहेत हे पाहून गावचा विकास करण्यासाठी कटिबद्ध आहोत, खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश करताना मला ज्यांनी ऊर्जा दिली त्यातील एक तुमचे गाव असून आज या गावांमध्ये नामदेव महाराज समाधी सभा मंडप उद्घाटन समारंभासाठी मला बोलावले याबद्दल सदैव आपल्या सर्वांचे ऋण फेडण्यासाठी तत्पर राहणार असल्याचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले

यावेळी जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com







श्री सर्वेश्वर गणेश मंदिरात गणेश जयंती साजरी

बीड शहरातील सहयोगनगर भागातील श्री सर्वेश्वर गणेश मंदिरात शनिवारी गणेश जयंती दुपारी १२ वाजता आरती करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

## संक्षिप्त वृत्त

### प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण साठी नवीन उद्दीष्ट प्राप्त

**बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल ५०१८ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ३४९९ घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

आर्थिक मागणी झाल्यास संपर्क करा

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर आर्थिक मागणी झाल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

### वंजारी वधु वर पालक संवाद बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

मातृभुमी प्रतिष्ठान संचलित वंजारी विश्व वधु वर नोंदणी महासंघाच्या वतीने नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड ,बीड येथे १२ जानेवारी २०२५ रोजी १७ वा राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला .

या मेळाव्यास वधु वर व पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. ज्या पालकांना आपल्या वधु वराची नवीन नोंदणी करायची आहे अशांनी रविवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी कृष्णाई नगर, आगलावे इस्टेट, अंकुश नगर, जुना चऱ्हाटा रोड, बीड येथे बैठकीचे आयोजन केले असून या बैठकीस कार्यकारिणी सदस्य तसेच राज्यस्तरीय मेळाव्यास वधु वराची नोंदणी केलेल्या पालकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक समितीच्या वतीने डॉ. संजय तांदळे , रामदास हंगे, उत्तमराव मिसाळ, मोहनराव सिरसाठ, प्रा. डी. जी. तांदळे, पांडुरंग जायभाये, बाजीराव ढाकणे, आत्माराम वाव्हळ, प्रा बाळासाहेब नागरगोजे, उध्दव लाड, बी. बी .जायभाये यांच्यासह मान्यवरांनी केले आहे.

### संस्काररत्न पुरस्काराने शिष्यवृत्ती धारक प्रभंजन वैद्य सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

संस्कार प्रबोधिनी बीड द्वारा संचलित संस्कार प्राथमिक विद्यालय बीडचा अत्यंत गौरवास्पद असणारा शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यानिमित्त दिला जाणारा संस्काररत्न पुरस्कार चिरंजीव प्रभंजन प्रेरणा प्रेरक वैद्य (६वीक) यास गुणवंत पालकांसह प्रमुख मान्यवर संस्कार प्रबोधिनीचे ज्येष्ठ संचालक डॉक्टर रेणुकादास जिंतूरकर उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे सुनील क्षीरसागर प्रशांत थेटे एडवोकेट मिलिंद वाघिरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला . इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती धारक होण्याचा बहुमान प्राप्त केल्याबद्दल सदरील पुरस्कार प्रदान करण्यात आला .

संस्कार विद्यालयाच्या उज्ज्वल शैक्षणिक सुयशयाचा कीर्ती ध्वज फडकवल्याबद्दल आज भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी त्याच्या झालेल्या सन्मानाबद्दल संस्कार प्रबोधिनीचे संस्था अध्यक्ष डॉ शरद रायते सचिव एडवोकेट के पी थिगळे डॉक्टर अनुराग पांगरीकर एडवोकेट पाठक व इतर सर्व संचालक मंडळ विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीमती लीला जाधव व सतीश गंधे पर्यवेक्षक रघुनाथ तावरे पाचवी सातवी विभाग प्रमुख सुनील सोनवळकर सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी वृंद व पालकांनी अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# धनंजय मुंडेंना भगवान गडाचा आधार का घ्यावा लागतोय?

## खा.बजरंग सोनवणेंनी उपस्थित केला प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

भगवान गड हा भक्कमपणे धनंजय मुंडे यांच्या पाठीशी आहे, असे महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटले. त्यांनी कोणाला पाठींबा द्यावा, हा त्यांचा अधिकार आहे परंतु धनंजय मुंडेंना आता गडाचा आधार का घ्यावा लागत आहे. त्यांना त्यांचा पक्ष आणि नेते दुरावत असल्याचे जाणवत आहे का? म्हणून ते गडाचा आधार घेत आहेत का? असा प्रश्न खा.बजरंग सोनवणे यांनी केला.

दिल्ली येथे माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना खा.सोनवणे म्हणाले, भगवान गडाचे महंत यांचा आदर आहे परंतु ते मस्साजोग प्रकरणात का बोलले हे माहित नाही. संतोष देशमुख हत्या प्रकरणी आरोपीची मानसिकता का झाली, असे महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटले. परंतु आरोपी हा आरोपी असतो, त्यांची मानसिकता तपासा असे बाबा का म्हणाले हे मला माहित नाही. पण आरोपींची मानसिकता तपासा म्हणजे आरोपी कोणाच्या संपर्कात आहेत हे तपासा असे त्यांना म्हणायचे असेल. दरम्यान, भगवान गड सर्वांचे श्रध्दास्थान आहे. ग्रामीण भागातून सर्वच जाती-धर्माचे लोक भगवानगडावर श्रद्धेने जातात. भगवान गडाने एका समाजाच्या पाठीमागे उभा राहू नये. धनंजय मुंडेंच्या पाठीशी उभा राहिले असतील तर तो त्यांचा अधिकार आहे. याबाबत आपण काही बोलणार नाही, असेही ते म्हणाले. याच बरोबर संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबधित मस्साजोग येथील आवादा कंपनीच्या खंडणी प्रकरणी जे आरोपी अटक आहेत. त्यांना कोठडी दिली की लगेच त्यांच्या पोटात कसे दुखते, या आरोपींना ठेवण्यासाठी सरकारी दवाखान्यामध्येही लगेच वार्ड रिकामा केला जातो. त्याठिकाणी उपचार घेणाऱ्या रूग्णांना हाकलून दिले जाते, हे काही योग्य नाही. सदरील आरोपीवर उपचार करावेत, यासाठी कोण दबाव आणत होते, याबाबत सीडीआर तपासावेत, सीडीआर तपासले तर यामागे कोण आहे, हेही समोर येईल, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

## सोमवारी लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

## जाती तोडा समाज जोडा हा वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र जपणे काळाची गरज- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

आजच्या कलोशीत झालेल्या समाज मनाला एकत्रित करण्याचे काम पारंपारिक काळापासून वारकरी संप्रदायाने केले आहे जातीपातीला थारा न देता सर्व समाज बांधवांना एकाच छत्र छायेखाली आणण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले आहे ।।ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया, नामा तयाचा किंकर, त्याने रचिले हे आवर, मा उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी उभा केलेल्या वारकरी संप्रदायाचा विस्तार संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत चोखामेळा, संत जनाबाई आदी संतांनी केला आहे, जाती तोडा समाज जोडा हा वारकरी सांप्रदायाचा मूळ मंत्र जपणे हीच आता काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहून मठाधिपती ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले, यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गोरक्षनाथ टेकडीच्या विकासासाठी आपण कटीबद्ध असून आतापर्यंत ९ कोटींची कामे झाली असून मेणार्या काळात रस्ता, फरशी आणि कंपाउंड कामासाठी आपण प्रयत्न करणार आहोत, आजच्या काळात संत महतांच्या विचाराप्रमाणे वागण्याची गरज असून संतांच्या कार्यामुळे लोहचुंबकाप्रमाणे माणसे एकत्रित करण्याचे महत्त्वपूर्ण काम होऊ लागले आहे. या गडाच्या विकासासाठी सत्ता असो अथवा नसो आपण सतत प्रयत्नशील असून जाणीवपूर्वक विकास कामे करण्यावर आपण भर दिलेला आहे. गडाच्या भक्तांकडून वारंवार होणार्या मागणीचा विचार करून यासाठी आपण प्रमत्न करत असतो मनात भाव ठेवून कुठलेही भक्ती करा गोरक्षनाथ टेकडीचा भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात आहे. वैकुंठवासी किसन बाबा मांनी अखंडपणे सुरू केलेली ही परंपरा मठाधिपती नवनाथ बाबा यांनी कायम ठेवली असून दरवर्षी मोठ्या प्रमाणात सप्ताह साजरा करत असतात आणि परिसरातील भक्तांना एकत्रित करून घेतात. या ठिकाणी जात पात धर्म कुठलाही भेद न ठेवता सर्व जाती धर्मातील भाविकांना एकत्रित केले जाते. बीड जिल्ह्याची ही परंपरा मोठी आहे वारकरी सांप्रदाय हे बीड जिल्ह्याचे वैभव असून ते टिकवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. या ठिकाणी असलेल्या रस्त्याची समस्या फरशी आणि कंपाउंड यासाठी प्रस्ताव देऊन तो मंजूर करून आणू असेही ते म्हणाले. यावेळी ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज, ह.भ.प.अखंडानंद गिरी महाराज, माउली महाराज वडवणीवर, माजी मंत्री बदामराव पंडित, माऊली महाराज बेदरकर, गंगाधर घुमरे, अरुण डाके, सखाराम मस्के, अरुण लांडे, हनुमान देवकते, नारायण देवकते, दादासाहेब लांडे, बंडू गाडीवान, चंद्रकांत फड, जनार्दन जोगदंड, बाबुराव करांडे, दिनकर लांडे, कांतराव डोईफोडे, सुनील थोरात, रामा भोगे, सोमनाथ माने, ओमप्रकाश खवतड, शाम काकडे, कैलास देवकते, नागेश शिंदे, बंडू लांडे, परमेश्वर थापडे यांच्यासह परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात मातृ पितृ पूजन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ फेब्रुवारी**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शनिवारी दि.१ रोजी सकाळी मातृ पितृ पूजन सोहळा कार्यक्रम संपन्न.



या कार्यक्रमाचे सुरूवात माता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच रामेश्वर जगताप, गडाम सर, गिरी बाबा, शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले आदींची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांचे पुष्पहार अर्पण करून पुजन केले. तर मुलांनी वृध्दापकाळात सांभाळ करण्याचा संकल्प केला. यावेळी बोलताना सरपंच रामेश्वर जगताप म्हणाले की, या कलियुगात मुलगा आई बापाला विचार नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वृध्दाश्रम वाढत आहे. परंतु आज श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत जो मातृ पितृ पूजन सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे मुलांना या माध्यमातून आपल्या आई वडिलांचे महत्व समजावून घेता आले. प्रयाग या ठिकाणी जसा महाकुंभ मेळा आयोजन होत आहे. त्यांची एक अनुभूती या ठिकाणी आली असल्याचे सांगून शाळेमध्ये राबविण्यात येणार विविध कार्यक्रम हे विद्यार्थ्यांना एक प्रकारे जगण्याच्या व पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणाऱ्या असतात. त्यातील हा एक मातृ पितृ पूजन सोहळा आहे. यामुळे विद्यार्थी देशेतच बालकांमध्ये चांगले संस्कार रुजविण्याचे काम व आपल्या आई वडिलांना विषयी आदर निर्माण करण्याचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. प्रस्ताविकपर भाषणात त्यांनी आपल्या जीवनात आई वडिलांचे किती महत्त्व असते हे सांगितले. पालकामधून राम पडुळे, मोहन वक्ते व गणेश मुगूटराव यांनी या कार्यक्रमाबद्दल आपले मत व्यक्त करुन विद्यार्थी मध्ये संस्कार रुजविण्यारे असे कार्यक्रम नक्कीच वारंवार शाळेने घ्यावा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्ताबाई मोटे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, भागवत सोळूंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे यांनी सहकार्य केले.

## बीड रेल्वे मार्गाची तपासणी; रेल्वे सुरक्षा आयुक्तच येणार भेटीला

### खासदार बजरंग सोनवणे यांच्याकडून रेल्वेला गती देण्याचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे ३ ते ६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान पुणे विभागातील विविध रेल्वे स्थानकांची तपासणी करणार आहेत. यात ते बीड रेल्वे स्थानक आणि तेथील सुविधांची देखील पाहणी करणार आहेत. खा.बजरंग सोनवणे हे लोकसभेचा निकाल लागल्याच्या पहिल्या दिवसांपासून रेल्वेला गती देण्यासाठी केंद्रस्तरावर पाठवुरावा करत आहेत.



अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून लढा सुरू आहे. अनेक लोकसभा निवडणूका देखील याच मुद्दयांवर झालेल्या असून या निवडणूकीत खा.बजरंग सोनवणे यांनी आपण रेल्वे कामाला गती देण्यासाठी कायम पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले होते. यानंतर निवडणूकीचा निकाल लागला आणि खासदारपदी विराजमान झाल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी पहिलीच बैठक रेल्वे विभागाची घेतली. यावेळी त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना रेल्वेच्या कामासाठी कालमर्यादा ठरवून दिली होती. त्यानूसार रेल्वेचे काम सुरू असून पहिल्या टप्प्यात अंमळनेर ते विघनवाडी आणि दुसऱ्या टप्प्यात विघनवाडी ते नवगण राजुरीपर्यंत रेल्वे धावली आहे. आता काहीच दिवसात नवगण राजुरी ते बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे. दरम्यान, रेल्वे सुरक्षा आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे स्वत: रेल्वे स्थानकांची तपासणी करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान महत्त्वाचे टप्पे ठरवण्यात आले असून यात, दि.४ फेब्रुवारी २०२५: विगनवाडी ते राजुरी स्थानकांदरम्यानची तपासणी, ५ फेब्रुवारी २०२५: राजुरी ते बीड स्थानकांदरम्यानची तपासणी, ६ फेब्रुवारी २०२५ बीड येथून तपासणी पूर्ण करून सकाळी ७ वाजता सीएसएमटी येथे आगमन होणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून बीड जिल्ह्यासाठी रेल्वे सुविधांच्या विकासाची मागणी केली आहे. या निरीक्षण दौऱ्यादरम्यान बीड स्थानकाच्या विकाससंदर्भात आवश्यक उपाययोजनांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. बीड जिल्ह्यातील नागरिकांना उत्तम रेल्वे सुविधा मिळाव्यात, यासाठी खा.सोनवणे सातत्याने प्रयत्नशील आहेत.